सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १९६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### तीन दिवसात सेन्सेक्सवर १९०० अंकांची तेजी



मुंबई : सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये सध्या तेजी पाहायला मिळत आहे. गेल्या तीन दिवसांमध्ये सेन्सेक्समध्ये १९०० अंकांची वाढ झाली आहे. दिवाळीपूर्वी भारतीय शेअर बाजारात तेजी असल्यानं गुंतवणकदारांना दिलासा मिळाला आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीनं उच्चांक गाठला आहे. निफ्टी ५० नं ५२ आठवड्यांचा उच्चांक गाठला आहे. तर, सेन्सेक्समध्ये गेल्या तीन दिवसांमध्ये १९०० अंकांची तेजी पाहायला मिळाली आहे. यामुळं शेअर बाजारात गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

### राज ठाकरेंच्या भूमिकेत सातत्य नाही : मुनगंटीवार



मुंबई : राज ठाकरे हे कुशल संघटक आहेत. मात्र, त्यांच्या भूमिकेत सातत्य नाही, कधी ते मोदींची स्तुती करतात तर कधी लाव रे व्हिडिओ म्हणत मोदींवर टीका करतात असे मत भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. त्यांचा राजकीय भरती-ओहोटीचा जो सिद्धांत आहे त्याप्रमाणे ते नवे आरोप करत आहेत. जेव्हा बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार काढण्यात आला, तेव्हा त्यांनी निवडणूक आयोगाला काँग्रेसचा बटीक आहे असं म्हटलं होतं, मतदार यादी हा काही फक्त निवडणूक आयोगाचा अधिकार नाही, तुम्ही देखील ती यादी सदोष आहे निर्दोष आहे हे तपासू शकता असे मुनगंटीवार म्हणाले. निवडणूक आयोग एकटा मतदार नोंदणी करु शकत नाही, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंत हजारो लोक सामील होतात २०१४ मध्ये केंद्रात आणि राज्यात भाजपचं सरकार आलं, तेव्हा तुम्ही असं म्हणता होता की केंद्रात मनमोहन सिंग यांनी आणि राज्यात पृथ्वीराज चव्हाण यांनी बोगस मतदार नोंदणी होऊ दिली. निवडणूक आयोग एकटा मतदार नोंदणी करु शकत नाही, अगदी तलाठ्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंत हजारो लोकं या प्रक्रियेत सामील होतात.

### निवडणूक आयोगाच्या विरुद्ध राऊतांकडून मोर्चाची घोषणा




मुंबई : महाविकास आघाडी आणि सहयोगी पक्षांकडून मुंबईत १ नोव्हेंबरला विराट मोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सर्वपक्षीय पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. या सर्वपक्षीय पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील, काँग्रेसचे सचिन सावंत, मनसेचे बाळा नांदगावकर, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते प्रकाश रेड्डी उपस्थित होते. खासदार संजय राऊत यांनी म्हटलं की शिवसेना भवनच्या पाचव्या मजल्यावर उद्धव ठाकरे पत्रकार परिषद घेतात. मात्र, त्यांच्या ऐवजी आज आपण पत्रकार परिषद घेतोय. महाराष्ट्र निर्माण सेनेचा संपूर्ण कॅबिनेट येथे आले आहे. बाळा नांदगावकर म्हणतात मी २४ वर्षांनी आले पानसे म्हणतात ११ वर्षांनी आलोय. गेल्या काही दिवसांपासून आम्ही निवडणूक आयोगा विरोधात लढाई लढतोय.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ३३ लाख पूरग्रस्त शेतकऱ्यांना ३ हजार कोटींची मदत



मुंबई : यंदा सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले. शेतीपासून लोकांची घरंदारं सगळंच पावसात वाहून गेलं. अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने मदतीचा हात पुढे केला आहे.

बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून ३३ जिल्ह्यातील, ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांच्या २७ लाख ५९ हजार ७५४.७७ हेक्टर वरील क्षेत्रावरील बाधित पिकांच्या मदतीसाठी ३ हजार २५८ कोटी ५६ लाख ४७ हजार इतका निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव - पाटील यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंती अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन विभागातर्फे नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम केले आहे. मागील सात दिवसात सुमारे ५ हजार कोटीवर निधी वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यंदाच्या खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सुमारे सात हजार ५०० कोटीची मदत वितरणास मान्यता देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री जाधव पाटील यांनी व्यक्त केला आहे. नागपूर विभागातील तीन लाख ७६ हजार ९६८ शेतकऱ्यांच्या ३ लाख ४४ हजार ६२९. २४ हेक्टर बाधित क्षेत्रातील ३४० कोटी ९० लाख ८ हजार निधीचा समावेश आहे.


**नागपूर विभाग :** ३.७६ लाख ९६८ शेतकऱ्यांच्या ३.४४ लाख ६२९.३४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३४०.९० कोटी ८ हजार निधी. नागपूर : १.०२ लाख ८५० शेतकऱ्यांच्या ८५ हजार ६४१.८८ हेक्टर क्षेत्रासाठी ११२.३७ कोटी रुपये. चंद्रपूर : ९३ हजार ८९५ शेतकऱ्यांच्या ८१ हजार ७२६. ८० हेक्टर शेत्रास्तही ६९.४६ कोटी ८६ हजार रुपये. वर्धा :१ लाख शेकऱ्यांच्या ४९ हजार ५४६ शेतकऱ्यांच्या १.६७ लाख ४७६.९६ हेक्टर क्षेत्रासाठी १४२.४० कोटी ११ हजार रुपये. भंडारा- १८ हजार ९५३ शेतकऱ्यांच्या ६ हजार ४२५.४१ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी ४८ लाख ३६ हजार रुपये. गोंदिया- सहा हजार ३९८ शेतकऱ्यांच्या दोन हजार ३०९.४६ हेक्टर क्षेत्रासाठी तीन कोटी ५० लाख २१ हजार रुपये. व गडचिरोली- पाच हजार ३२६ शेतकऱ्यांच्या एक हजार ४८.८३ हेक्टर क्षेत्रासाठी दोन कोटी ६७ लाख ५४ हजार रुपये. अमरावती : विभागातील चार लाख ७८ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या ४५ हजार ८८२.७४ हेक्टर क्षेत्रासाठी ३८ कोटी ४ लाख ५१ हजार रुपये. यवतमाळ : २ लाख २१ हजार ३८४ शेतकऱ्यांच्या ३ लाख ७ हजार ६२३. ४३ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ८ लाख हजार रुपये.

**पुणे : विभागातील ८ लाख २५ हजार १८९ शेतकऱ्यांच्या सात लाख ९ हजार क्षेत्रासाठी २६२ कोटी ८ लाख ४५ हजार रुपये. सातारा – ३ हजार ३८८ शेतकऱ्यांच्या १ हजार ५६२. ६७ हेक्टर क्षेत्रासाठी २ कोटी ४९ लाख ५ हजार रुपये. सोलापूर : ६ लाख ७८ हजार ५९२ शेतकऱ्यांच्या पाच लाख ३८ हजार ८८९. हेक्टर क्षेत्रासाठी ७७२ कोटी ३६ लाख ४५ हजार रुपये. पुणे- ५२ हजार ७८९ शेतकऱ्यांच्या २१ हजार ९५१.९४ हेक्टर क्षेत्रासाठी ३४ कोटी ४२ लाख ८७ हजार रुपये. सांगली – ९० हजार ४२० शेतकऱ्यांच्या एक लाख ४६ हजार ८०५ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ३५ लाख रुपये**

**नाशिक विभाग :** १५ लाख ७९ हजार २३९ शेतकऱ्यांच्या ११ लाख ५० हजार ३०१. ७६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १४७४ कोटी ८४ लाख ९ हजार. नाशिक – चार लाख नऊ हजार ७४७ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८८ हजार ८०६ हेक्टर क्षेत्रासाठी ३१७ कोटी १५ लाख ७७ हजार रुपये. धुळे : १६ हजार ३५७ शेतकऱ्यांच्या ११ हजार ५९४. ९ हेक्टर क्षेत्रातील १० कोटी २२ लाख ९७ हजार कोटी. नंदुरबार : ९३१ शेतकऱ्यांच्या ४४५. ०६ हेक्टर क्षेत्रासाठी ५३ लाख ९९ हजार. जळगाव : ३ लाख २५ हजार ३५९ शेतकऱ्यांच्या २ लाख ४७ हजार २६२.०१ हेक्टर क्षेत्रासाठी २९९ कोटी ९४ लाख ४७ हजार रुपये. अहिल्यानगर : ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांच्या सहा लाख २ हजार १९४. हेक्टर क्षेत्रासाठी ८४६ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपये

**कोकण विभाग :** १ लाख ५ हजार २३९ हजार शेतकऱ्यांच्या २९ हजार २३३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रातील २८ कोटी १० लाख ६३ हजार निधी. ठाणे : ३५ हजार ६७६ शेतकऱ्यांच्या नऊ हजार ४८० . ११ हेक्टर क्षेत्रासाठी ८ कोटी ३७ लाख ६५ हजार रुपये. पालघर : ४९ हजार ५१७ शेतकऱ्यांच्या १३ हजार ७४४. २३ हेक्टर क्षेत्रासाठी १४ कोटी ४२ लाख ६५ हजार. रायगड : १८ हजार ५७८ शेतकऱ्यांच्या ५ हजार ८२९. ४६ हेक्टर क्षेत्रासाठी ५ कोटी नऊ लाख ९ हजार. रत्नागिरी : १ हजार १५३ शेतकऱ्यांच्या १०३.८८ हेक्टर क्षेत्रासाठी १३ लाख ५३ हजार रुपये.

## पुराचा फटका बसलेल्यांना दिलासा मिळणार, केंद्राकडून मोठी मदत



नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी २०२५-२६ या वर्षासाठी कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्य सरकारांना एसडीआरएफच्या केंद्रीय हिश्श्याचा दुसरा हप्ता म्हणून १, ९५०.८० कोटी रुपये आगाऊ देण्यास मान्यता दिली आहे. या वर्षी नैऋत्य मान्सूनमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या लोकांना तात्काळ मदत करण्यासाठी या राज्यांना मदत करण्यासाठी १,९ ५०.८० कोटी रुपयांच्या एकूण रकमेपैकी ३८४.४० कोटी रुपये कर्नाटकसाठी आणि १,५६६.४० कोटी रुपये महाराष्ट्रासाठी मंजूर करण्यात आले आहेत .

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, केंद्र सरकार पूर, भूस्खलन आणि ढगफुटीमुळे बाधित झालेल्या राज्यांना सर्वतोपरी मदत करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे.

या वर्षी, केंद्राने डऊ्रझ अंतर्गत २७ राज्यांना १३,६०३.२० कोटी रुपये आणि छऊ्रझ अंतर्गत १५ राज्यांना २,१८९.२८ कोटी रुपये आधीच जारी केले आहेत. याव्यतिरिक्त, राज्य आपत्ती निवारण निधी मधून २१ राज्यांना ४,५७१.३० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी मधून ०९ राज्यांना ३७२.०९ कोटी रुपये जारी केले आहेत.

केंद्र सरकारने पूर, भूस्खलन, ढगफुटी यासारख्या घटनांमध्ये बाधित झालेल्या सर्व राज्यांना आवश्यक असलेली एनडीआरएफ पथके, लष्करी पथके आणि हवाई दलाची मदत यासह सर्व प्रकारच्या लॉजिस्टिक सहाय्य पुरवले आहे. या वर्षीच्या पावसाळ्यात, बचाव आणि मदत कार्यासाठी ३० राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये एनडीआरएफच्या सर्वाधिक १९९ पथके तैनात करण्यात आली होती.

### बिहारमधून निवडणूक लढवणार ७२ वर्षांचे आजोबा

पाटणा : बिहारमध्ये विधानसभेची निवडणूक होत आहे. यंदा बडा खोदाबंदपूर गावात राहणारे राम स्वार्थ प्रसाद हे ७२ वर्षांचे आजोबा निवडणूक लढवत आहेत. सर्वपक्षीय नेत्यांना जे जमले नाही ते काम करणार, मतदारसंघाचा विकास करणार असे आश्वासन देत राम स्वार्थ प्रसाद यांनी निवडणूक लढवत असल्याचे जाहीर केले आहे. चेहऱ्यावर सुरकुत्या जरी आल्या असल्या तरी राम स्वार्थ प्रसाद यांचा आत्मविश्वास एखाद्या मोठ्या नेत्यासारखा आहे. निवडणुकीत विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. बिहारमध्ये बडा खोदाबंदपूर गावात राहणारे राम स्वार्थ प्रसाद चेरिया बेरिया विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

## मुंबई विमानतळावर १.६ कोटींच्या सोन्याची तस्करी, दोघांना अटक

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालयाने (ऊठख) मोठी कारवाई करत दोन सफाई कर्मचाऱ्यांना अटक केली आहे. या कर्मचाऱ्यांवर १.६ कोटी रुपयांच्या सोन्याच्या तस्करीत सहभागी असल्याचा आरोप आहे.

गुप्त माहितीनंतर डीआरआयच्या मुंबई झोनल युनिटने विमानतळावर तैनात असलेल्या काही कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवायला सुरुवात केली होती. याच दरम्यान एका सफाई कर्मचाऱ्याच्या संशयास्पद हालचाली अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्या. विमानाची साफसफाई झाल्यानंतर त्या कर्मचाऱ्याने एरोब्रिजच्या जिन्यावर धाव घेतली आणि एका कोपऱ्यात एक पॅकेट लपवण्याचा प्रयत्न केला. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करत ते पॅकेट जप्त केले. त्यामध्ये पांढऱ्या कापडात गुंडाळलेली आणि मेणाच्या रूपात लपवलेली १.२ किलो सोन्याची धूळ आढळली. या सोन्याची किंमत सुमारे १.६ कोटी रुपये आहे.

तपासात उघडकीस आले की, हा कर्मचारी विमानतळावरील सफाई कर्मचाऱ्यांच्या टीम लीडरपदी कार्यरत आहे. त्याने तपासाधिकाऱ्यांना कबूल केले की, ओळख पटू नये म्हणून त्याने हे पॅकेट लपवले होते. पर्यवेक्षकाने सोनं विमानातून बाहेर काढून लपवण्यासाठीच दिले होते, अशी कबुली कर्मचाऱ्याने दिली. ही कबुली मिळताच डीआरआयने त्वरित पर्यवेक्षकालाही ताब्यात घेतले. दोघांनाही सीमा शुल्क कायदा, १९६२ अंतर्गत अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात असेही समोर आले आहे की, हा प्रकार एका आंतरराष्ट्रीय तस्करी सिंडिकेटचा भाग असून त्यामध्ये परदेशी प्रवाशांचाही सहभाग आहे. प्रवासी विमानातच सोने लपवून ठेवत आणि विमानतळावरील कर्मचारी ते ताब्यात घेऊन गुप्तपणे बाहेर काढत होते.

डीआरआयच्या म्हणण्यानुसार, ही घटना विमानतळांवरील अंतर्गत प्रवेश आणि कर्मचाऱ्यांच्या सहभागाच्या माध्यमातून कशी मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जाते याचे उदाहरण आहे.

## स्वावलंबी महिलेला पोटगी मिळणार नाही; उच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली : घटस्फोट प्रकरणात पोटगी हा महत्वाचा मुद्दा असतो. वैवाहिक भांडणे न्यायालयात सादर झाल्यावर पोटगी वरून अनेक वाद बघायला मिळतात. सगळ्याच बाजूने विचार केला तर हा एक महत्वाचा मुद्दा आहे. अशातच, दिल्ली उच्च न्यायालयाने या महत्वाच्या मुद्द्याचा निकाल लावला आहे. जोडीदार जर स्वतंत्र आणि स्वावलंबी असेल तर पोटगी देता येणार नाही, असा महत्वपूर्ण निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे.

१७ ऑक्टोबर रोजी न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथ यांनी एका खटल्याचा निकाल लावला. भारतीय वाहतूक सेवेच्या गट अ च्या कर्मचारी यांनी मांडलेल्या मुद्यांवर सुनावणी करण्यात आली.

केस नक्की काय होती ?

एका वकिलाबरोबर २०१० साली रेल्वे मध्ये अधिकारी असलेल्या महिलेचे लग्न झाले होते. २०२३ साली मानसिक छळामुळे त्यांचा घटस्फोट झाल्याचे समोर आले. पण घटस्फोटाच्या दरम्यान पतीने पोटगी देण्यास नाकारले. त्यामुळे, पत्नीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

याचिका दाखल झाल्यावर पतीने पत्नीवर मानसिक छळाचे आरोप केले व अपशब्द , अपमानास्पद बोलणे, व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रात बदनामी करणे यांसारखे आरोप केले गेले. त्यामुळे त्यांचा घटस्फोट झाला पण पत्नीने ५० लाखांची मागणी केली व तिच्या प्रतिज्ञापत्रातही ही गोष्ट नमूद करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाचे म्हणणे काय होते ?

हिंदू विवाह कायदा कलम २५ चा दाखला देत उच्च न्यायालयाने घटस्फोट झालेल्या महिलेला पोटगी देण्यात येणार आहे. पतीचे वेतन, मालमत्ता , उत्पन्न , कमाई क्षमता , आणि सारासार विचार करून पोटगी निश्चित केली जाईल. परंतु पत्नी जर स्वावलंबी असेल तर पोटगी दिली नाही, जाणार असेही न्यायालयाने म्हटले.

न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथ यांच्या म्हणण्यानुसार कलम २५ हे सर्वांना आर्थिक न्याय मिळून देते. घटस्फोटानंतर ज्याच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन नसलेला पक्ष निराधार होणार नाही याची खात्री केली जाते. तसेच पत्नी स्वावलंबी असेल तर पतीवर अन्याय होऊ देत नाही.

सध्याच्या केस मध्ये पत्नी ही स्वावलंबी व रेल्वे अधिकारी असल्यामुळे ती स्वतः चे पालनपोषण करू शकते. त्याचबरोबर, आर्थिक असमर्थता आणि दबाव यांचा कोणताच पुरावा नसल्यामुळे पत्नीने मांडलेली पोटगीची याचिका रद्द करण्यात आली.

## एकाचवेळी झाला सात मित्रांचा मृत्यू



नंदुरबार : नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील अस्तंबा अर्थात अश्वस्थामा यात्रेतून परतणाऱ्या यात्रेकरूंना दुर्दैवी प्रसंगाला सामोरे जावे लागले. शनिवारी (१८ ऑक्टोबर) सकाळी तळोदा-धडगाव रस्त्यावर चांदशैली घाटात झालेल्या भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून २८ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये घोटाणे आणि कोरिट या दोन गावांतील तरुणांचा समावेश आहे.

धनत्रयोदशीच्या निमित्ताने सातपुड्यातील अस्तंबा ऋषींच्या शिखरावर दर्शनासाठी गेलेल्या यात्रेकरूंचा हा प्रवास होता. दर्शन घेतल्यानंतर सकाळी ते परतीच्या प्रवासाला निघाले होते. वाहनात तब्बल ३५ जण बसलेले होते. मात्र चांदशैली घाटातील एका तीव्र वळणावर चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि वाहन थेट दरीत कोसळले. क्षणार्धात सर्वकाही संपले. वाहन दरीत कोसळताच आत बसलेल्या प्रवाशांपैकी काहीजण दाबले गेले तर काहींना जबर मार लागून जागीच मृत्यू झाला.

या अपघातात पवन गुलाब मिस्तरी (२४), बापू छगन धनगर (२४), चेतन पावबा पाटील (२३), भूषण राजेंद्र गोसावी (३०), राहुल गुलाब मिस्तरी (२२, सर्व रा. घोटाणे), तसेच हिरालाल जगन भिल (३८) आणि योगेश लक्ष्मण ठाकरे (२८, रा. कोरिट) यांचा जागीच मृत्यू झाला. गणेश संजय भिल (१३, रा. शबरी हट्टी) या अल्पवयीन मुलाचाही मृत्यू झाला. सर्व मृत हे नंदुरबार तालुक्यातील रहिवासी आहेत. दिवाळीच्या सुट्टीत दर्शनासाठी एकत्र गेलेल्या सात मित्रांचा एकत्र मृत्यू झाल्याने दोन गावांवर शोककळा पसरली आहे.

## कोरोना काळात रुग्णाच्या मनाविरुद्ध उपचार, मृतदेहाची परस्पर विल्हेवाट; नगरच्या ५ नामांकित डॉक्टरांवर गुन्हे दाखल

अहिल्यानगर : कोरोना काळात रुग्णाच्या मर्जीविरुद्ध उपचार करून घेतल्याचा, अवाजवी बिल आकारल्याचा, तसेच मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याचा गंभीर आरोप शहरातील पाच नामांकित डॉक्टरांसह डॉ. विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटलमधील पॅथॉलॉजिकल लॅबच्या तज्ञ डॉक्टरांवर करण्यात आला आहे. या प्रकरणात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात न्यूक्लिअस हॉस्पिटलचे डॉ. गोपाळ बहुरुपी, डॉ. सुधीर बोरकर, डॉ. मुकुंद तांदळे, डॉ. अक्षयदीप झावरे पाटील, डॉ. सचिन पांडुळे, तसेच विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटलमधील पॅथॉलॉजिकल लॅबचे तज्ञ डॉक्टर आणि काही अज्ञात कर्मचारी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा अशोक खोकराळे यांच्या फिर्यादीवरून नोंदवण्यात आला असून, त्यांनी न्यायालयाच्या आदेशानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

खोकराळे यांच्या फिर्यादीनुसार, ऑगस्ट २०२० मध्ये त्यांच्या वडिलांना कोरोनाची लक्षणे दिसल्याने उपचारासाठी न्यूक्लिअस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. परंतु रुग्णाच्या मर्जीविरुद्ध जबरदस्तीने ॲडमिट करून घेतल्याचा, त्यांच्या आरोग्यस्थितीची खरी माहिती लपवण्यात आल्याचा आणि जाणीवपूर्वक जास्त प्रमाणात औषधे दिल्याचा आरोप आहे. तसंच रुग्णालयाकडून अवाजवी बिल आकारण्यात आल्याचंही फिर्यादीत म्हटलं आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर नातेवाईकांना त्याबाबत योग्य माहिती न देता मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात मृतदेहाचे ठसे आणि पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचंही तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे. या आरोपांनंतर तोफखाना पोलिसांनी संबंधित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. यामुळे वैद्यकीय क्षेत्रात तसेच रुग्णांमध्ये प्रचंड संतापाची लाट पसरली आहे.

### 'वडिलांच्या मृत्यूची माहितीही दिली नाही...'

**तक्रारदार अशोक खोकराळे यांनी सांगितले, कोरोना काळात आमच्या वडिलांचा मृत्यू झाला तरी आम्हाला त्याबद्दल योग्य माहिती दिली गेली नाही. आम्ही अनेकदा हॉस्पिटलशी संपर्क साधला पण प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी न्याय मिळवण्यासाठी आम्हाला न्यायालयात धाव घ्यावी लागली.या प्रकरणाचा पुढील तपास तोफखाना पोलीस करत आहेत. या गुन्ह्यामुळे शहरात वैद्यकीय व्यावसायिकांबद्दल अविश्वासाची भावना निर्माण झाली असून, रुग्णांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**

## नाशिकमध्ये कर्मभूमी एक्स्प्रेसमधून तिघे खाली पडले, दोघांचा मृत्यू, १ गंभीर जखमी

नाशिक : मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनसहून सुटलेल्या आणि बिहारच्या रकसोलकडे जात असलेल्या कर्मभूमी एक्स्प्रेसमधून (गाडी क्रमांक १२५४६) तीन युवक खाली पडल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (१८ ऑक्टोबर) रात्री नाशिक रोडजवळ घडली. या दुर्घटनेत दोन युवकांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून, तिसरा युवक गंभीर जखमी आहे. सध्या त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शनिवारी सायंकाळी कर्मभूमी एक्स्प्रेस नाशिक रोड रेल्वे स्थानकावर न थांबता पुढे गेली. काही वेळाने ओढा स्थानकाचे स्टेशन मास्तर आकाश यांनी नाशिक रोड रेल्वे प्रशासनाला माहिती दिली की, ढिकलेनगर, हनुमान मंदिराजवळ रेल्वेतून तीन युवक खाली पडले. या माहितीनंतर नाशिक रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक माळी, हवालदार भोळे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. किलोमीटर १९०/१ ते १९०/३ या रेल्वे मार्गादरम्यान (पटरी) दोन युवक मृतावस्थेत तर एक युवक गंभीर अवस्थेत आढळून आला.

जखमीला तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या दिवाळीचा काळ सुरू असल्याने उत्तर भारताकडे जाणाऱ्या गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे.

## रोखठोक

# आश्वस्ततेकडून अस्वस्थतेकडे

**दिनेश गुणे**

गेल्या वर्षी, २२ ऑगस्ट २०२४ या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक आश्वासक माहिती दिली आणि संपूर्ण देशाची मान अभिमानाने उंचावली. भारताला 'जगाचे औषधालय' अशी जागतिक मान्यता मिळाली असून, भारतीय औषध उद्योगाने जगाच्या आरोग्यपूर्ण जीवनशैलीत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे, असेही मोदी यांनी जाहीर केले. त्या दिवशी देशातील अनेकांस कोविड महामारीचा तो जीवघेणा काळदेखील नक्कीच आठवून गेला असेल. हा काळ जीवनमरणाच्या संघर्षातील कसोटीचा काळ होता. त्याआधीच्या शंभर वर्षांत असा संघर्ष देशानेच नव्हे, तर जगानेही अनुभवला नव्हता आणि जीव वाचविण्याचे जेवढे मार्ग त्या क्षणी उपलब्ध होते, त्यावर आपले पाऊल पहिल्यांदा पडावे म्हणून एक भयंकर जीवघेणी स्पर्धादेखील सुरू होती. एका अकल्पित भयपटाचे वास्तविक रूप जग अनुभवत असताना, भारताच्या औषध उद्योगाने देशाला आणि जगाला दिलासा देणाऱ्या औषधांची निर्मिती केली. कोविडच्या संसर्गाने प्रतिबंध करणारी लस विक्रमी काळात तयार करून विश्वबंधुत्वाच्या सांस्कृतिक प्रेरणेतून जगातील अनेक देशांच्या नागरिकांसाठी ही लस उपलब्ध करून देण्याचा संकल्प भारताने सोडला आणि जागतिक राजकारणाच्या पटलावर भारताच्या बंधुभावाच्या परंपरेचे एक आगळे दर्शन घडले. एका पूर्णपणे अनोळखी आजाराशी सामना करण्याची वेळ आल्यामुळे जग भांबावून गेले होते. या आजारावर नेमके उपचार कोणते याची वैद्यकविश्वासही कल्पना नव्हती आणि केवळ वेगवेगळ्या प्रयोगांतून आजारास प्रतिबंध करण्याचे केविलवाणे प्रयत्न सुरू झाले होते. अनेकांना त्याचे विपरीत परिणामही भोगावे लागले, अनेक जणांनी योग्य औषधोपचाराच्या प्रतीक्षेतच अखेरचा श्वास घेतला, तर अनेकांच्या अकाली मृत्यूचे गूढ वलय वैद्यकविश्वासही उकलता आले नाही. अशा काळात भारताच्या औषधनिर्मिती व्यवसायाने संकटाशी सामना करण्याकरिता स्वतःस झोकून दिले. त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आणि महामारीच्या संकटाशी सामना करणे शक्य आहे, ही धीर देणारी जाणीव रुजू लागली. जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी, मृत्यूचे थैमान थांबविण्यासाठी ही बाब मोठी दिलासादायक ठरली होती. या काळात लस पुरवठा करण्यात, वेगवेगळी औषधे पुरविण्यात आणि वैद्यकीय उपचारांकरिता आवश्यक ती साधने पुरविण्यात या औषधनिर्मिती उद्योगाने कर्तव्यभावाने जी जागतिक भूमिका बजावली, त्याला जगाकडून मिळालेली ही मान्यतेची पावती होती.

साहजिकच, तेव्हा निर्माण झालेली भारतीय औषधनिर्मिती व्यवसायाची ही प्रतिमा सातत्याने उजळ राहील याची खबरदारी घेण्याची जबाबदारीही या उद्योगावर पडली होती. तरीही, त्या काळात या प्रतिमेवर डाग लागणाऱ्या काही अप्रिय घटनांचाही या उद्योगास सामना करावा लागला होता. रेमडेसीवीर नावाचे एक औषध कोविडला प्रतिबंध करू शकते, असे दिसू लागल्यावर ते उपलब्ध व्हावे यासाठी रुग्णांनी व असंख्य नागरिकांनी केलेल्या जीवघेण्या संघर्षाच्या कहाण्या अजूनही अंगावर शहारे आणतात आणि त्या मरणकाळाच्या आठवणी नकोशा होऊन जातात. एका बाजूला जगाच्या आरोग्यासाठी झटणाऱ्या औषधनिर्मिती व्यवसायात जीवघेण्या स्पर्धेचाही शिरकाव झाला, नफेखोरीचा कलंकही लागला आणि त्यातून बनावटगिरीनेही संधी साधून आरोग्यासमोर आव्हानेदेखील उभी केली. संकटाआडून फसवणुकीच्या संधी साधून खिसे भरू पाहणाऱ्या प्रवृत्तींचे दर्शनही त्या जीवघेण्या काळात घडून गेले आणि माणुसकी नावाच्या भावनेला कलंक लागला. याच रेमडेसीवीरच्या एका इंजेक्शनसाठी हजारो रुपये मोजण्याची तयारी असलेल्या लाखो रुग्णांना त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत असताना, बनावट रेमडेसीवीरचा साठादेखील उजेडात येऊ लागला. निव्वळ पॅरासिटामॉलचे पाणी भरलेल्या बाटल्यांवर रेमडेसीवीरचे लेबल लावून त्या बाजारात विकणाऱ्या टोळ्यादेखील या काळात उजेडात आल्या आणि विश्वाचे औषधालय असलेल्या भारताच्या औषध उद्योगात प्रतिमा जपण्याचे खडतर आव्हान पेलणे सहज व सोपे नाही याचीही जाणीव अधोरेखित झाली. महाराष्ट्रात बारामती येथे सातारा जिल्ह्यातील एका रुग्णाचा या बनावट रेमडेसीवीरमुळे मृत्यू झाला होता. या जीवघेण्या साथीशी संघर्ष करताना सामान्य माणसे हतबल झाली असून जगण्यासाठी काहीही करण्याची त्यांची धडपड सुरू असल्याचे पाहून बारामती परिसरातील काही विकृत मानसिकतेच्या माणसांनी वेगवेगळ्या इस्पितळांतील रेमडेसीवीरच्या रिकाम्या बाटल्या गोळा केल्या व त्यामध्ये पॅरासिटामॉलचे पाणी भरून त्या मूळ औषध म्हणून भरमसाट दराने विकण्यास सुरुवात केली. यातील एका इंजेक्शनमुळे एका रुग्णाला मृत्यू पत्करावा लागला, तेव्हा या बनावटगिरीवर प्रकाश पडला आणि कारवाईचे फास आवळले गेले.

असे म्हणतात, की दुधाने तोंड पोळले की ताकदेखील फुंकून पिण्याची सावधगिरी आपोआप मनात रुजते. त्या बनावट रेमडेसीवीर प्रकरणानंतर औषध व्यवसायाभोवती संशयाचे धुके दाटले. कोणतेही औषध घेण्याआधी, त्याच्या खरेपणावरच प्रश्नचिन्हे उमटत होती, पण सामान्य माणसांकडे खरेपणाची शहानिशा करण्याचे मार्ग मात्र मर्यादितच असतात. विश्वासू दुकानातून औषधे घ्यावीत, त्यावरील लेबल तपासून पाहावे, त्या औषधनिर्मिती कंपनीची पृष्ठभूमी जाणून घ्यावी एवढीच काही अशा औषधांची विश्वासार्हता तपासण्याची मर्यादित साधने हाताशी असलेल्यांना मूळ बाटलीतील औषधे बनावट असू शकतात याची कदाचित जाणीवही नसावी. त्यामुळेच, काही औषध उत्पादक कंपन्यांना आपली प्रतिमा व प्रतिष्ठा सिद्ध करण्याचे आव्हानही पेलावे लागले. नव्याने प्रतिष्ठित होऊ पाहणाऱ्या औषधनिर्मिती कंपन्यांसाठी तर हा काळ अस्तित्वाची कसोटी ठरविणारा होता. त्यावर मात करून



जेव्हा जगाने भारताच्या औषधनिर्मिती उद्योगावर मान्यतेची मोहर उमटवली, भारत ही जगाची औषधशाळा आहे हे पंतप्रधानांनी जाहीर केले, तेव्हा या उद्योगाला कसोटी पार पाडल्याचे असीम समाधान अनुभवता आले आणि औषध उद्योगावरील सामान्य माणसाचा विश्वास दुणावला. जुलै २०२३ मध्ये भारतीय औषधांची निर्यात २.१३ अब्ज डॉलर्स एवढी होती. जुलै २०२४ मध्ये त्यामध्ये तब्बल ८.३६ टक्के वाढ नोंदवली गेली आणि भारतीय औषध उद्योगाने २.३१ अब्ज डॉलर्स किमतीची औषधे निर्यात केली होती. त्या एका आर्थिक वर्षात औषधांच्या निर्यातीत सुमारे ८५ टक्के वाढ झाल्याचे जाहीर करून पंतप्रधानांनी या उद्योगाचे अभिनंदन केले. अमेरिका, बेल्जियम, दक्षिण आफ्रिका, ब्राझील, इंग्लंडसह जगभरातील सुमारे २०० देशांत भारतीय औषधांची निर्यात होते. त्या दशकात भारतीय जैवतंत्रज्ञान क्षेत्रासाठी १३ पटींनी झळाळी आली आणि २०१४ मध्ये १० अब्ज डॉलर्सची उलाढाल असलेले हे क्षेत्र २०२४ च्या अखेरीस १३० अब्जांच्या उलाढालीने तेजाळले.

आरोग्य हा प्रत्येक जीवाचा मौलिक मूलभूत अधिकार आहे. तो जपला गेला पाहिजे, याकडे देशाच्या राज्यघटनेचाही कटाक्ष आहे. त्यामुळे, आरोग्यसेवेत वेळोवेळी जाणवणाऱ्या त्रुटी दूर करून ही सेवा अधिकाधिक प्रभावी व्हावी अशी जनतेचीही अपेक्षा असते. कोविड महामारीच्या काळात या क्षेत्रातील असंख्य त्रुटी स्पष्ट झाल्या आणि जीवघेण्या संकटकाळाशी सामना करण्यातील तोकडेपणाही सिद्ध झाला. या क्षेत्रात बरीच मजल मारली असली, तरी अजूनही पुढील वाटचाल मोठी आहे, याची जाणीव या संकटाने करून दिली होती. त्यामुळेच, गुणवत्ता व नैतिकतेस प्राधान्य देणे अपरिहार्य ठरले. 'प्रत्येक नागरिकास आरोग्यपूर्ण जीवनाचा अधिकार' हे उद्दिष्ट स्वीकारून सन २००० पर्यंत ते साध्य करण्याचा संकल्प १९७५ साली केंद्र सरकारने सोडला होता. औषध व्यवसाय क्षेत्र अधिकाधिक सक्षम व आत्मनिर्भर कसे होईल, यावर अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी एक समितीही १९७५ मध्ये स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या अहवालाने या क्षेत्रासाठी वाटचालीची नेमकी दिशा आखून दिली, असे म्हटले जाते. उच्च गुणवत्तेची औषधे परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध झाली पाहिजेत, यावर या समितीने भर दिला होता. त्यासाठी गुणवत्ता व मूल्य नियंत्रणाची यंत्रणा निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली आणि या व्यवसायाच्या वाटचालीला शिस्त लागली.

अर्थात, या प्रतिष्ठेला गालबोट लावणाऱ्या काही घटनांची अलिकडच्या काळातील नोंद अस्वस्थ करणारी आहे. उझबेकिस्तानमध्ये भारतीय बनावटीच्या कफ सिरपमुळे बालकांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर जगाच्या या औषधालयावरील विश्वासावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने जगभरात या औषधाविरोधात सावधगिरीच्या सूचना जारी केल्या, तेथील न्यायालयात खटले दाखल झाले आणि संबंधितांना शिक्षादेखील झाली. जगाचे औषधालय म्हणून प्रतिष्ठा प्राप्त होत असलेल्या भारतीय औषध उद्योगाची ही एक प्रकारची फजिती होती. मात्र, त्यानंतरही या उद्योगात भेसळ आणि बनावटगिरीचे धंदे सुरूच राहिल्याचे अलिकडच्या काही जीवघेण्या घटनांवरून स्पष्ट झाले. राजस्थान आणि मध्य प्रदेशातही, खोकल्याचे औषध घेतल्यामुळे बालके दगावल्याच्या घटनांमुळे या क्षेत्रात खळबळ माजली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या औषधाचा वापर न करण्याचा इशारा जगाला दिला आहे, तर भारतातील बाजारपेठेतून हे औषध मागे घेण्यात आले आहे. खोकल्यावरील औषधे हा एक सर्वसाधारण उपचार मानला जातो. सर्दी, खोकल्यासारख्या आजारावरील उपचाराकरिता दवाखाने गाठण्याची सवय सामान्य जनतेस नाही. केवळ आपल्या अनुभवाच्या आधारे किंवा औषध विक्रेत्याच्या सल्ल्याने औषधे घेण्याचाही अनेकांचा कल असतो. त्यामुळे, खोकल्यावरील औषधोपचारांचे मान्यताप्राप्त निकषही सर्वांस माहीत नाहीत. याच अनुभवामुळे अशा आजारांवरील औषधांचा दर्जा राखण्याची नीती मागे पडली असावी. प्लॅस्टिक उद्योगात आणि रंग, शाई निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या डायथिलिन ग्लायकॉल नावाच्या घातक रसायनाचा प्रमाणाबाहेर करण्यात आलेला वापर हे या मृत्युकांडाचे कारण असल्याचा निष्कर्ष आता पुढे येत आहे. या रसायनाची अतिरिक्त मात्रा शरीरात गेल्यास पचनसंस्था व मूत्रसंस्थांच्या कार्यास अडथळे निर्माण होतात व प्रसंगी ते जीवघेणेही ठरतात. हे स्पष्ट असूनही या औषधामध्ये त्याचा वापर करणे हा निव्वळ गुन्हेगारी स्वरूपाचा निष्काळजीपणा ठरतो. या निष्काळजीमुळेच अनेक जीव काळाआड गेले आणि वेळीच उघडकीस आल्याने मोठ्या संकटापासून बचाव करणे शक्य झाले असले तरी हा केवळ चिंतेचा विषय नाही, तर या व्यवसायातील नैतिकतेने कोणता स्तर गाठला आहे याचा गंभीर विचार करण्याची वेळ आली आहेच. केवळ खोकल्याच्या औषधाच्या जागतिक बाजारपेठेवरही आज भारताचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. भारतातून अनेक देशांत खोकल्यावरील औषधांची निर्यात होते. ही निर्यात सुमारे साडेपाच अब्ज डॉलर्सची असून येत्या पाच-सात वर्षांत हा आलेख सात अब्ज डॉलर्सचा टप्पा गाठेल असे चित्र आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत खोकल्यावरील औषधांमुळे भारतातच अनेक जीवघेणे प्रकार घडल्याचे उघडकीस आले आहेत. सुमारे पाच दशकांपूर्वी चेन्नईत १४ बालकांचा या औषधातील डायथिलिन ग्लायकॉलच्या भेसळीमुळे मृत्यू झाला होता. १९८६ मध्ये मुंबईत याच रसायनाची भेसळ असलेल्या ग्लिसरिनमुळे १४ जण मरण पावले, तर २०२० मध्ये जम्मूच्या उधमपूर जिल्ह्यात याच भेसळीमुळे १२ बालके दगावली होती. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये विषारी कफ सिरपच्या या मृत्युकांडाने खळबळ माजलेली असतानाच आता मध्य प्रदेशातील ग्वालियर येथे एका सरकारी इस्पितळात, बालकांच्या सामान्य आजारावरील उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिजैविकाच्या बाटलीत चक्क किडे आढळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. औषधनिर्मिती उद्योगातील नीतिमत्तेवर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या या घटना सामान्य नाहीत. वेगवेगळ्या नावांनी, प्रतिष्ठित कंपन्यांची लेबले वापरून दुय्यम दर्जाची किंवा बनावट औषधे बाजारात घुसविण्याचे प्रकार समोर येत आहेत. विशेष म्हणजे, बनावट औषधांच्या वेष्टणांवरील लेबले, पॅकिंग, हे मूळ औषधाएवढेच हुबेहूब असल्याने, बनावटगिरीचा संशयदेखील न येता ग्राहक डोळे मिटून त्याची खरेदी करत असल्याने बनावट औषधांची समांतर बाजारपेठच उदयास येत असून आरोग्याच्या मूलभूत हक्काला आव्हान दिले जात आहे. बनावट औषधांचा व्यापार करणारे एक जाळे देशभर पसरल्याची भीती व्यक्त होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मतानुसार, बनावट औषधांच्या समांतर बाजारपेठांची उलाढालही अब्जावधींच्या घरात असून यापैकी अनेक उत्पादनांत औषधी गुणधर्म तर नाहीतच, उलट जीवघेण्या पदार्थांचीच भेसळ असल्याने आजार बरे होण्याऐवजी जिवावर बेतण्याचीच शक्यता अधिक असते. काही बनावट औषधे धोकादायक नसली, तरी आजार बरे करण्याची क्षमताही त्यामध्ये नसते. काही बनावट औषधे तर केवळ नशा करण्यासाठीही वापरली जात असल्याचे उघडकीस आले आहे. केवळ माणसांकरिता असलेल्या औषधांतच नव्हे, तर प्राण्यांवरील उपचारांकरिता वापरल्या जाणाऱ्या औषधांतही भेसळ होत आहे आणि त्यात अशा औषधांचाही काळाबाजार होत आहे. बनावट औषधांच्या उघडकीस येणाऱ्या प्रकारांत मुख्यत: कर्करोग, मूत्रपिंडविकार, हृदयरोग, मधुमेह, स्नायू विकारांवरील उपचाराकरिता वापरल्या जाणाऱ्या औषधांचाच भरणा अधिक असल्याने, थेट जिवावर बेतणाऱ्या या संकटाचे वाढते आक्रमण चिंताजनक आहेच, पण या क्षेत्रात भारताने प्रस्थापित केलेल्या जागतिक प्रतिष्ठेवर यामुळे प्रश्नचिन्हही उभे राहिले आहे. ज्या क्षेत्राकडे आश्वस्ततेने पाहावयाचे, त्याच क्षेत्रामुळे आरोग्य व्यवस्था अस्वस्थ झाली आहे. हे चित्र बदलायला हवे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### नरक चतुर्दशी

ज्यावेळी पृथ्वीवर अत्याचार वाढतो, त्यावेळी निसर्गच त्या अत्याचाराचं निरसन करतो. या मृत्युलोकात कित्येक जणांनी अमरत्वाचे वरदान प्राप्त व्हावे म्हणून तपश्चर्या केली. पण मृत्युलोकात कुणीही सप्तचिरंजीवांव्यतिरिक्त अमर राहू शकत नाही. सत्ययुगाच्या शेवटी हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू अत्याचारी असुर झालेत. त्यांच्यापासून पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी भगवान विष्णूने वराहअवतार व नृसिंह अवतार घेतला. हिरण्याक्षचा वध केल्यावर वराह अवतार



व पृथ्वीपासून नरकासुर नावाचा मुलगा झाला. हा लहान असताना चांगला होता पण बाणासुराच्या संगतीने दुष्ट दुराचारी झाला व प्रजेला खूप त्रास द्यायचा. त्याने १६,१०० राजकन्येचे अपहरण करून त्याच्या स्वतःच्या बंदिखान्यात ठेवले होते. ऋषिमुनी व सामान्य प्रजेला खूप त्रास देत होता. एकदा नरकासुराने स्वर्गावर आक्रमण केले. इंद्रदेव व सर्व देवतांना बंदी केले. त्याचा सामान्य प्रजेवरील अत्याचार पाहून ऋषींनी त्याला विष्णूच्या हातून तुझा मृत्यू होईल असा शाप दिला. त्यानंतर नरकासुराने ब्रह्मदेवाची तपश्चर्या केली. ब्रह्मदेवाकडून ऋषी, मुनी, देव, गंधर्व, दानव, यक्ष, किन्नर यांच्याकडून त्याचा मृत्यू होणार नाही असा वर मागितला. त्यामुळे तो आणखीनच निर्भय होऊन दुष्ट प्रवृतीने वागू लागला. देवमाता अदितीचे अमृत कर्णकुंडले नरकासुराने पळवून नेले. त्रस्त जनता देवाला नरकासुराच्या त्रासापासून लवकरात लवकर सुटका करा असे विनवू लागली. तेव्हा कालांतराने द्वापारयुगात श्रीहरी विष्णूने भगवान श्रीकृष्णाचा अवतार घेतला तेव्हा कृष्णाची पत्नी सत्यभामा व कृष्ण जनउद्धाराकरिता नरकासुराशी युद्ध करतात. युद्ध खूप घनघोर होतं. शेवटी भगवान श्रीकृष्ण आपल्या सुदर्शनाने नरकासुराचा वध करतात आणि १६,१०० राजकन्यांना नरकासुराच्या कैदेतून मुक्त करतात. त्या मुक्त केलेल्या राजकन्या श्रीकृष्णाला म्हणतात की, ''आम्ही आतापर्यंत नरकासुराच्या कैदेत असल्याने आमच्याशी कुणीच लग्न करणार नाही . लोक आमच्याकडे वाईट नजरेने बघतील'' म्हणून त्या आत्महत्या करणार होत्या . तेव्हा भगवान श्रीकृष्ण त्या १६,१०० राजकन्यांना म्हणाले ,''आत्महत्या करणे हे पाप आहे . मी तुम्हा सर्वांशी लग्न करतो.'' यापूर्वी श्रीकृष्णाच्या आठ धर्मपत्नी होत्या. आता १६,१०० राजकन्यांशी विवाह केल्याने श्रीकृष्णाच्या पत्नी १६,१०८ झाल्यात. नरकासुराच्या त्रासापासून सर्व जनतेचे श्रीकृष्णाने रक्षण केले. आश्विन महिन्यात कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी ही घटना द्वापारयुगात घडली. म्हणून दिवाळीच्या पाच दिवसात एक 'नरक चतुर्दशी' हा एक दिवस आपण अत्याचारावर विजय म्हणून आनंदाने साजरा करतो .

**डॉ. मिलिंद इंदूरकर**/९५५२६०७६४६

●● ●●

### शॉर्टकट चुकीचाच

नुकत्याच केलेल्या हिमाचल प्रदेश पर्यटनात आमचा बव्हंशी प्रवास पर्वतरांगांतून झाला. रस्त्यांच्या कडेला असलेल्या काही खडकांवर लक्ष आकर्षित करणारे संदेश लिहिलेले होते. त्यातील दोन मनात घर करून राहिले. पहिला होता 'हर काम देश के नाम'. अन् दुसरा म्हणजे 'शॉर्टकट टालिए.' पहिला संदेश वाचून ऊर भरून आलं. वाटलं प्रत्येक भारतवासीयाने तो संदेश पुढल्या पिढीला सक्रियपणे हस्तांतरित करायला हवा. दुसऱ्या संदेशात जरी डोंगराळ भागांत प्रवास करताना शॉर्टकट्स टाळावेत असा अर्थ अभिप्रेत असला तरी तो वाचून विचारांचं चक्र सुरू झालं. आपण सगळेच आपल्या दैनंदिन जीवनात किती तरी शॉर्टकट्स घेतो. ते कळत नकळत आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनलेले असतात. मग त्या सगळ्यांनाच टाळायचं की त्यापैकी काहींनाच? असे कोणते शॉर्टकट्स आहेत जे टाळणे आवश्यक आहे? असो. हा विचार करताना आपल्या सर्वांना परिचित असणाऱ्या काही ठळक शॉर्टकट्सनी मनात गर्दी केली : (१) तरुण सुशिक्षित आई-वडील त्यांच्या शाळकरी पाल्यांना दुचाकींवर शाळेत सोडायला जाताना बिनदिक्कतपणे वाहने चुकीच्या बाजूने (रॉंग साईडने) चालवणे. याचं मुख्य कारण शाळेत जाण्यासाठी झालेला उशीर. (२) पावसाळा सुरू होण्यापूर्वी अथवा नुकताच सुरू झाल्यावर महानगरपालिकेकडून माती, विटांचे तुकडे, मुरूम व गिट्टी टाकून रस्त्यावरील लहान मोठे खड्डे बुजवणे. (३) झटपट पैसे मिळविण्याची मानसिकता मनात रुजून तिचं रूपांतर गुन्हेगारीत होणे. (४) यश आणि नाव कमविण्याच्या अट्टहासाने पेटून निघालेल्या सुशिक्षित आणि सुसंस्कृत तरुणांचे अनैतिक मार्गांचे अवलंबन करून ते मिळवणे. सधन आणि/ अथवा पाश्चात्त्य देशात देखील पायलीला पन्नास शॉर्टकट्स घेतले जातात. मात्र खेदाची गोष्ट ही की आपण आंधळेपणाने ते आयात करतो आणि अभिमानाने अमलात आणतो.

या आणि अशा इतर शॉर्टकट्सच्या संभाव्य परिणामांबद्दल अनभिज्ञ असल्याचे आपण भासवतो किंवा 'माझा त्याच्याशी काय संबंध?' असा पवित्रा घेऊन मोकळे होतो. त्याबद्दल खेद वाटणे अथवा पश्चात्ताप होणे तर दूरच. शॉर्टकट कसाही अथवा कुठलाही असो, त्याचे दुष्परिणाम आपल्याच कुटुंबाला, समाजाला, देशाला आणि मुख्य म्हणजे आपल्या नंतरच्या पिढ्यांना भोगावे लागतील या सत्याकडे आपण सोयीस्कररीत्या दुर्लक्ष करतो. मग भविष्यात तेच शॉर्टकट्स वेताळासारखे आपल्या मानगुटीवर बसून आपल्याला रडकुंडीला आणतात. रोल मॉडेल्स असण्याऱ्या स्वतःच्या आई वडिलांनाच मुले वाहतूक आणि इतर नियम भंग करताना रोज प्रत्यक्ष बघतात तेव्हा तेच प्रमाण असा त्यांचा ठाम समज होतो, ज्यामुळे ते चुकीच्या गोष्टी वाढत्या आत्मविश्वासाने करत मोठे होतात. या शॉर्टकट मानसिकतेची काही करणे आहेत : (१) 'आत्ता ' संस्कृतीचा प्रादुर्भाव व त्यामुळे निर्माण होणाऱ्या उतावीळपणाचा अतिरेक. (२) संयमाचा संपूर्ण अभाव. (३ ) आपण हाती घेतलेल्या कामातील जोखीमांचा लेखाजोगा मांडण्याची व त्यावर मात करणाऱ्या कृतींविषयीची अनभिज्ञता. (४) अनैतिक मार्गांचे धाडसी अवलंबन व (५) परिश्रमाच्या मोलाविषयीची अजाणता.

अशा परिस्थितीत कल्पकता, सर्जनशीलता, विश्वासार्हता, नैतिकता इ. निकषांवर आधारित प्रगतीची स्वप्ने आपल्याला साकारता येतील का हा प्रश्न अनुत्तरित राहतो. या संदर्भात अमेरिकेचे माजी परराष्ट्र सचिव कॉलिन पॉवेल यांचे 'शॉर्टकट विल कट यू शॉर्ट' हे उद्धरण फार सूचक आहे. शॉर्टकट ही एक अभिमानास्पद संस्कृती बनू पाहते आहे. ती निश्चितच धोक्याची घंटा आहे. आपण या बाबतीत काहीही न करण्याची अथवा गमावलेल्या संधींची फार मोठी किंमत येणाऱ्या पिढीला चुकवावी लागेल.

**कमलेश पंडे**/९८२३०३५४४२

●● ●●

### दिवाळी आणि झाडूउद्योग

दिवाळी म्हटलं की प्रत्येकघरी नवीन झाडू आणला जातो. काही वर्षांपूर्वी घरोघरी शिंदीच्या पानांपासून तयार केलेले झाडू वापरत असत. एकेकाळी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील अनेक गावांत हा फळे (झाडू) बनविण्याचा गृहउद्योग भरभराटीला आलेला होता. अनेक गावांतील ओसाड जागी अथवा उजाड माळ रानात, नदीकाठी ही शिंदी/ शिंदोळीची झाडे आढळायची. या झाडाच्या लांबलचक पानांच्या झापांपासून परंपरागत व्यावसायिक पसरट झाडू बनवून बाजारात विकत असत. खजुराच्या झाडासारख्या दिसणाऱ्या या शिंदीच्या झाडाच्या पानांपासून चटया, टोपल्या, केरसुण्या अशा अनेक वस्तू बनविल्या जात असत. या झाडाच्या पानांपासून बनवलेले झाडू खराटी, टोपले गावात गल्लोगल्ली फिरून विक्री केली जात होती. त्यातून मिळणाऱ्या पैशांवर बऱ्याच गृहउद्योगी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असे. अनेक वर्षांपासून हा व्यवसाय करीत असलेल्या लोकांचे शिंदीचे झाड जगण्याचा आधार झालेला होता.

हळूहळू काळ बदलला, आधुनिक युग आलं, पसरट त्रिकोणी केरसुणी/झाडू फळ्यांची जागा लांब गोलाकार गाला, टायगर, अशा विविध कंपन्यांच्या ब्रुमने घेतली आणि ही पिढी जुन्या झाडूला मुकली.

**पंकज वसंत पाटील**/९८५०४३०५७९

●● ●●

### खरे लक्ष्मीपूजन

लक्ष्मीपूजन ही भारतीय संस्कृतीतील एक वैशिष्ट्यपूर्ण पूजा आहे. ही पूजा आश्विन महिन्यातील अमावस्येला संध्याकाळी केली जाते. शास्त्रानुसार, जेव्हा उपासक लक्ष्मीपूजन करतो, तेव्हा त्या पूजेतून लक्ष्मीचे तत्त्व उपासकाकडे प्रक्षेपित होते. हे तत्त्व आपण सतत साधनेच्या रूपात अंगीकारले, तर लक्ष्मी आपल्या सोबत राहते. परंतु उपासकाच्या मनात 'अहं' निर्माण झाला, तर ती लक्ष्मी निघून जाते. खऱ्या अर्थाने लक्ष्मीपूजनाचा आनंद घ्यायचा असेल, तर आपण लक्ष्मीचे तत्त्व असलेल्या प्रत्येक गोष्टीत तिचे रूप पाहून त्याचा योग्य उपयोग करायला हवा. जल हे लक्ष्मीला अतिशय प्रिय आहे, कारण ती समुद्राची कन्या आहे. समुद्रमंथनातून लक्ष्मी प्रकट झाली. त्यामुळे दैनंदिन जीवनात आपण वापरत असलेले जल योग्य पद्धतीने वापरले, तर लक्ष्मी स्थिर राहते. आपण लक्ष्मीला धनाची देवी मानतो. म्हणून धनाचा योग्य विनियोग करून, दानधर्म करणे, तसेच सत्पात्राला दान देणे हे आवश्यक आहे. यामुळे लक्ष्मी स्थिर राहते.

धान्य म्हणजेच लक्ष्मी. अन्नाचीही ती देवता आहे, जिची आपण 'अन्नपूर्णा' म्हणून पूजा करतो. अन्न वाया न घालवता, आवश्यक तेवढाच उपयोग केल्यास



लक्ष्मी प्रसन्न राहते आणि आपल्या घरी स्थिर होते. लक्ष्मीपूजन दिव्याच्या प्रकाशात केले जाते. दिवा पाहून लक्ष्मी येते असे मानले जाते. दिवा म्हणजे प्रकाश. आजच्या काळात हा प्रकाश म्हणजे वीज. आपण वीज योग्य प्रकारे वापरली, तरीही लक्ष्मी आपल्या घरात स्थिर राहते. 'दिवाळी' म्हणून एका दिवसापुरता खर्च करून मिळणारा आनंद क्षणिक असतो; पण लक्ष्मीपूजनाचा खरा आनंद रोज लक्ष्मीचे स्मरण ठेवून योग्य कृती करण्यात आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

### ट्रम्प यांच्या कोलांटउड्या

एखाद्या इरसाल उतावळ्या माणसाची गावचा तंटामुक्ती अध्यक्ष बनण्याची खुमखुमी पूर्ण झाली नाही तर तो स्वतःच गावात मर्कटलीला करण्याचा सपाटा लावतो आणि त्यामुळे निर्माण झालेले तंटे सोडविण्यात सारा गाव गुंततो. अशी अनेक उदाहरणे आपण गावगाड्यात बघतो. पण हीच नशा जर अमेरिकेसारख्या महासत्ता म्हणविणाऱ्या राष्ट्रप्रमुखास चढली तर त्याचे काय परिणाम होतात या अनुभवाने सारे जग हैराण आहे. जगातील अनेक युद्धे आपल्यामुळेच थांबलीत अशा आरोळ्या त्यांनी ठोकाव्या आणि साऱ्या जगाने गुमान ते मान्य करावे हा त्यांचा आविर्भाव दीर्घकाळ टिकला नाही. भारत-पाकिस्तानमधील संभावित अणुयुद्ध आपणच थांबविले हा त्यांचा दावा भारताने साफ झिडकारला. आणि जगाचे तंटामुक्ती अध्यक्ष बनण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. त्यांनी भारतावर लावलेले पंचवीस टक्के टॅरिफ व रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे आकारलेला पंचवीस टक्के दंड या पुढे भारत झुकला नाही. तीव्र प्रतिक्रियाही नोंदविली नाही. कारण तसे करणेही मानसशास्त्रीयदृष्ट्या दुर्बलतेचे लक्षण असते. उलट निर्यातीसाठी कुठल्याही एकाच देशावर विसंबून राहणे भविष्यासाठी कसे धोकादायक आहे हे ओळखून पर्यायी उपायांचा शोध सुरू केला. इंग्लंड, इस्रायल या देशांशी केलेला मुक्त व्यापार करार त्याचाच एक भाग होता. रशियाकडून तेल आयात कायम ठेवून अमेरिकन टॅरिफ वॉरने दुखावलेल्या ब्राझीलसारख्या देशाशी तेल खरेदीचे नवे करार करून भारताने आपला धोरणीपणा दाखवून दिला. एवढेच नाही तर चीनच्या धूर्तपणाचे अनुभव पाठीशी असतानाही झाले गेले गंगेला न मिळू देता तत्कालीन गरज म्हणून याही शेजाऱ्याशी जुळवून घेतले. त्याहून थोर बाब ही की पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन करताच स्वदेशीचा मंत्र आत्मनिर्भर भारतासाठी कसा तारणहार ठरू शकतो यावर देशात चिंतन सुरू झाले आहे.

नवरात्रीपासून तर पाच आणि अठरा टक्के असे नवे सुटसुटीत कर स्लॅब असणारे जीएसटी धोरण सरकारने लागू केले आहे. त्यामुळे जवळपास सर्व दैनंदिन जीवनावश्यक वस्तू फक्त पाच टक्के जीएसटीमुळे स्वस्त झाल्या.

भारतात हे सारे घडत असताना एच-१ बी व्हिसासाठी १ लाख डॉलर्स प्रतिवार्षिक शुल्क आकारण्याची घोषणा करून डोनाल्ड ट्रम्प यांनी जगासमोर आणखी एक कोलांटउडी मारली आहे. अमेरिकेत जवळपास पन्नास लाख भारतीय राहतात. त्यामुळे ही घोषणा जगासाठी असली तरी अमेरिकेत काम करणाऱ्या एकूण तंत्रज्ञांपैकी सत्तर टक्के भारतीय असल्याने त्याची झळ भारतीय तरुणांना अधिक बसेल. जुन्या कर्मचाऱ्यांनी चोवीस तासात अमेरिकेत परतावे नाहीतर त्यांनाही दंड भरावा लागेल असे फर्मान काढल्याने कामानिमित्त भारतात आलेल्या तरुणांनी तर धसकाच घेतला. नंतर व्हाईट हाऊसच्या माहिती प्रसारण सचिवांनी जुन्या कर्मचाऱ्यांना व ज्यांना एच- १ बी व्हिसाची मुदतवाढ मिळाली आहे त्यांना शुल्क भरावे लागणार नाही असे स्पष्टीकरण दिले. पुढे डोनाल्ड ट्रम्प यांनी १ लाख डॉलर्स प्रतिवर्षी नव्हे तर फक्त एकदाच भरावे लागेल अशी सुधारित घोषणा करून पुन्हा एक कोलांटउडी मारली.

डोनाल्ड ट्रम्प यांचा चेहरा प्रखर व कर्मठ राष्ट्रवादी नेत्याचा आहे. अर्थात तसे असणे यात काही गैर नाही. प्रत्येक देशाच्या राष्ट्रप्रमुखाने स्वतःचे राष्ट्र प्रथम हीच भूमिका घ्यायला हवी. पण राष्ट्रवादी नेत्यात नुसता बोलघेवडेपणा असून चालत नाही. त्यासाठी सदृढ धोरणीपणा अंगात भिनवावा लागतो. आपल्या घोषणांचा स्वतःच्या राष्ट्रावर, मित्रराष्ट्रांवर व एकंदरीत जागतिक स्थिरतेवर काय पडसाद उमटतील याचे अंदाज त्याला बांधता यायला हवेत. आखलेल्या धोरणांचे चिरस्थायित्व व त्याचे दूरगामी परिणाम याचा वेधही अशा नेत्यास घेता यायला हवा. अर्थात त्यांच्या या आडमुठेपणाचा व धरसोड धोरणांचा फटका भारतासारख्या देशाला बसत असला तरी तो तत्कालीन असेल. त्यासाठी दीर्घकालीन उपायांची पायाभरणी करायला भारताने सुरुवात केलेली आहे. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर अजूनही जगात अव्वल आहे. मात्र भारतापासून प्रेरणा घेऊन छोट्या मोठ्या देशांनी बेभरवशाचा सोबती म्हणून अमेरिकेची हेडमास्तरकी झुगारल्यास हा जागतिक महासत्तेच्या एककेंद्री हुकूमशाहीला लागलेला सुरुंग असेल आणि ती एक नव्या समतामूलक जागतिकीकरणाची सुरुवातही असेल.

**किशोर उरकुंडवार**/९९२१२६३०६२

### मोबाईलचे व्यसन वाईटच

मोबाईल ऊर्जा तुमचे आयुष्य वेगाने संपवत आहे. तो तुम्हाला वेळेचे महत्त्व जाणवू देत नाही. त्यामुळे तुमच्या निवांत रात्री संध्याकाळात बदलल्या आहेत. एकदा तुम्ही फोन उचलला की, तुम्ही व्यसनासारखे अनिच्छेने असूनही बराच वेळ स्क्रीनवरून स्क्रोल करता. तुम्हाला लक्षात येईल की तुम्ही पूर्वीसारखे पेपर वाचत नाही आहात, तुम्ही पुस्तके उलटत नाही आणि तुम्ही तुमचे टीव्ही पाहणे देखील कमी केले आहे. तुम्ही पूर्वीसारखे बोलत नाही, तुम्ही तुमच्या भावना शेअर करत नाही. तुमचे सर्व चौकशीचे स्रोत फक्त मोबाईल बनले आहेत. तुम्ही गप्पांमध्ये उपस्थित आहात पण तुम्ही गप्पा मारत नाही, तुम्ही मुळात फोनकडे पाहत आहे. तुम्ही चर्चेत उपस्थित असलात तरी तुम्ही उदासीन राहता. असे दिसते की तुमच्याकडे



करण्यासारखे, शिकण्यासाठी किंवा जाणून घेण्यासाठी काहीही नवीन नाही आणि या सर्वांमध्ये, तुम्ही तुमचा संपूर्ण दिवस मोबाईल फोनच्या वर्तुळात घालवला आहे, ज्यामुळे तुम्हाला दिवस कसा संपत आहे हे समजत नाही.

आणि एका दिवसात प्रत्यक्षात किती वेळ आहे किंवा तुम्ही किती वेळ वापरू शकता पण तुम्ही तो वापरत नाही हे समजून घेणे. रील्स, पोस्ट, स्टोरीजवरील लाईक कमेंट्सच्या व्यसनामुळे आपण आपल्या आयुष्यातील मौल्यवान वेळ गमावला आहे. फक्त एक काम करा. एके दिवशी फक्त तुमचा फोन बंद करा आणि २४ तास त्यापासून दूर राहा. तुम्हाला खरोखरच जाणवेल की तुमच्याकडे संपूर्ण दिवसात किती वेळ आहे. तुम्हाला असे वाटेल की वेळ जात नाहीये. तुम्हाला जाणवेल की एक दिवस खरोखर किती मोठा आहे. आणि तुम्हाला हे देखील कळेल की तुम्ही तुमच्या मोबाईल फोनचे किती व्यसन केले आहे. तुम्ही तुमचा फोन पाहिल्यावर तुम्हाला बरे वाटेल.

तुम्ही ते वापरून पाहू शकता. कारण अशा प्रकारे तुमचे आयुष्य वाया घालवण्यात काही अर्थ नाही. एकेकाळी जगात व्यसन निर्माण झाले होते. नंतर व्यसनमुक्ती केंद्रे. हा मोबाईल फोन तुम्हाला नजीकच्या भविष्यात मानसिक रुग्ण देखील बनवेल. तुम्हाला पुनर्वसनाची मदत घ्यावी लागेल. जेणेकरून तुम्हाला या आयुष्यात असे करावे लागू नये, आतापासूनच जागरूक राहा. केवळ व्यसनच नाही तर मोबाईल फोन लोकांच्या प्रतिभेसह आपल्या निरोगी समाजालाही हळूहळू नष्ट करत आहेत.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

## आजचे संघगीत-१७

रविवार, १९ ऑक्टोबर २०२५

### तू दिधलिस संजीवनी

राष्ट्रजीवनी जागविली तू जाणिव ओजस्विनी
दिव्य तू दिधलिस संजीवनी

तव रूपाने या भूमीवर
प्रकट जाहला नव योगेश्वर
व्यष्टीचा तू समष्टीसवे योग साधला जनी

संघशक्तिचा महान स्रष्टा
लोकसंग्रही तू तर द्रष्टा
सायुज्याची सुरू साधना शाखेशाखेतुनी

राष्ट्रभक्तिचे दीप चेतवुन
आलोकित त्वा केले जनमन
प्रकाशात त्या भेदांचे भ्रम वितळुन गेले क्षणी

एकत्वाचा मंत्र अलौकिक
संघटनेचे तंत्र अमोलिक
अभिनव अनुपम अभियानाचा संभव संघातुनी

अमृतवाणी तुझी केशवा
साधकास हो अक्षय ठेवा
मूर्तिमंत ती राष्ट्रचेतना, स्फूर्ती-मंदाकिनी

**गीत - सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २०२५ ने सर्व विक्रम मोडले

छत्रपती संभाजीनगर : अमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २०२५ ने भारतातील सण साजरे करण्याची आणि खरेदी करण्याची पद्धतच बदलून टाकली आहे. यंदा अमेझॉन इंडियावर तब्बल २७६ कोटी ग्राहक भेटी नोंदल्या गेल्या, ज्यापैकी ७०% ग्राहक टियर २ आणि टियर ३ शहरांमधून आले होते. या ग्राहकांनी स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही, साड्या, सणासुदीची सजावट, ब्युटी प्रॉडक्ट्स आणि दैनंदिन गरजांची खरेदी केली. ३० दिवसांच्या या उत्सवात केवळ पाच दिवस शिल्लक असताना, अमेझॉन इंडियाने सर्वच मापनांमध्ये विक्रमी सहभागाची घोषणा केली, ग्राहक भेटींचा आकडा आतापर्यंतच्या सर्वाधिक पातळीवर पोहोचला असून, विविध श्रेणींमध्ये शेकडो कोटींच्या जीएसटी बचतीला चालना मिळाली.

### नवीन कलेक्शन्स आणि आकर्षक ऑफर्स लाँच

छत्रपती संभाजीनगर - आनंदमय धनत्रयोदशी व दिवाळी सण देशभरात उत्साहाचे वातावरण आणणार असताना ओरा फाइन ज्वेलरीला आपल्या आकर्षक नवीन कलेक्शन्सच्या लाँचची घोषणा करताना आनंद होत आहे, जे परंपरेचे पैलू आणि समकालीन आकर्षकतेला साजरे करण्यासाठी बारकाईने डिझाइन करण्यात आले आहेत. यंदा सणासुदीच्या काळात ओरा ग्राहकांना अद्वितीय सौंदर्य व समृद्धतेसह आकर्षक दिसण्याचे आवाहन करत आहे, जेथे डिझाइन्सची लक्षवेधक श्रेणी, तसेच विशेष, मूल्य-केंद्रित ऑफर्स सादर करण्यात आल्या आहेत.

### ग्राहक टचपॉइण्ट्ससह महाराष्ट्रात उपस्थिती वाढवली

लातूर- स्कोडा ऑटो इंडियाने सोलापूरमध्ये नवीन फॅसिलिटी, तसेच लातूरमध्ये आपल्या पहिल्या ग्राहक टचपॉइण्टचे उद्घाटन केले आहे, ज्यासह महाराष्ट्रातील आपली नेटवर्क उपस्थिती दृढ केली आहे. गुरूकृपा कार्स प्रायव्हेट लिमिटेडसोबत सहयोगाने करण्यात आलेल्या विस्तारीकरणामध्ये सोलापूरमधील फुल-फंक्शन डिलरशिप (एफएफडी) आणि लातूरमधील सुसंगत ३एस फॅसिलिटीचा समावेश आहे, ज्यासह राज्यातील स्कोडाचे एकूण नेटवर्क ४४ ग्राहक टचपॉइण्ट्सपर्यत पोहोचले आहे. सोलापूरमध्ये नवीन उद्घाटन करण्यात आलेल्या फुल-फंक्शन डिलरशिप (एफएफडी)मध्ये २,९०० चौरस फूट विक्री क्षेत्रासोबत सहा कार्ससाठी प्रदर्शन क्षेत्र आहे, ज्याला पूरक ११,२०० चौरस फूट सर्विस सुविधा आहे, ज्यामध्ये पाच सर्विस बेज आहेत.

### विवो ने आंतरराष्ट्रीय स्तरावर ओरिजिन ओएस लाँच

पुणे - विवो चे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी शी युजियान म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून, विवो ने 'अधिक स्थानिक, अधिक जागतिक' या तत्त्वाचे पालन करून आणि वापरकर्त्यांच्या गरजांनुसार अनुभव देऊन जगभरात आपली उपस्थिती मजबूत केली आहे. तळीं चा ३० वा वर्धापन दिन साजरा करत असताना, आम्ही 'मूल डिज़ाइन' तत्वज्ञानाअंतर्गत, गुळगुळीतपणा, डिझाइन आणि एआयया तीन स्तंभांवर आधारित, ओरिजिनओएस ६ च्या जागतिक लाँचसह पुढील पाऊल उचलत आहोत, जे डिजिटल जगाशी कनेक्ट होण्याचा अनुभव पुन्हा परिभाषित करेल.ओरिजिन स्मूथ इंजिन सिस्टमच्या मुख्य मॉड्यूल्समध्ये अखंडपणे समन्वय साधते: संगणकीकरण, स्टोरेज आणि डिस्प्ले, प्रत्येक स्तरावर एक गुळगुळीत वापरकर्ता अनुभव प्रदान करते.८+१ अल्ट्रा-कोर संगणकीकरण ॲप कोल्ड-स्टार्ट गती १८.५% ने वाढवते आणि फ्रेम-रेट स्थिरता १०.५% ने सुधारते.

### नफा वाढून १२२ कोटी, तिमाहीत १८.२% वाढ

बेंगळुरू, ऑक्टोबर २०२५: उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.यांनी आज सप्टेंबर २०२५ ला समाप्त झालेल्या तिमाहीसाठीचा आपला आर्थिक अहवाल जाहीर केला.वन स्मॉल फायनान्स बँकेचे एमडी व सीईओ श्री. संजीव नौटियाल यांनी तिमाही निकालावर भाष्य करताना म्हटले: या तिमाहीत आम्ही संतुलित वाढ साध्य केली आहे. अतिरिक्त तरलता शोषून घेऊन आमचा सीडी रेशो ८८.२% वर पोहोचला. एकूण ठेवी ३९,२११ कोटींवर गेल्या असून, त्यात तिमाही आधारावर १.५% वाढ आणि वार्षिक आधारावर १५.१% वाढ झाली. सीएएसए ठेवी १०,७८३ कोटींवर, तिमाही आधारावर १४.९% वाढ आणि वार्षिक आधारावर २२.१% वाढ झाली. रिटेल टीडी व सीएएसए ठेवी मिळून एकूण ठेवींच्या सुमारे ७१% आहेत.


### विवो इंडियाने ओरिजिनओएस ६ इंडिया रोल-आउट टाइमलाइनची घोषणा केली

मुंबई - विवो इंडियाने आज देशातील त्यांच्या उत्पादन पोर्टफोलिओसाठी ओरिजिनओएस ६ (अँड्रॉइड १६ वर आधारित) साठी रोल-आउट टाइमलाइनची घोषणा केली. कंपनीची आतापर्यंतची सर्वात प्रगत ऑपरेटिंग सिस्टम असलेलीओरिजिनओएस ६, नोव्हेंबरच्या सुरुवातीलाएक्स सिरीज (एक्स२०० प्रो, एक्स२००, एक्स२०० एफई), आणि एक्सफोल्ड ५ ) आणि त६० वर बॅचमध्ये अपग्रेडसाठी उपलब्ध असेल, त्यानंतर एक्स१०० प्रो, एक्स१०० आणि एक्सफोल्ड ३ प्रोवर नोव्हेंबर २०२५ च्या मध्यापर्यंत अपडेट उपलब्ध असेल. वी सीरीज (वी ६०ई, वी ५०, आणि वी५०ई) आणि टी सिरीज (टी४ अल्ट्रा, टी४ प्रो, आणि टी४आर ५जी)) मधील डिव्हाइसेसना डिसेंबर २०२५ च्या मध्यापर्यंत अपडेट मिळेल. याव्यतिरिक्त, एक्स९०, एक्स९० प्रो, वी४०, टी४ ५जी, टी३ अल्ट्रा, वाई४०० ५जी यासारख्या इतर सिरीज डिव्हाइसेसना इतर विवो स्मार्टफोन्ससह २०२६ च्या पहिल्या सहामाहीपासून अपडेट मिळण्यास सुरुवात होईल.

### सीएम रिलीफ फंडास ५ कोटी रुपयांची देणगी

मुंबई : एकतेचा आणि करुणेचा सामर्थ्यशाली संदेश देत, अभय भुतडा फाउंडेशनने महाराष्ट्रातील पुरग्रस्त भागांना मदत करण्यासाठी ८ कोटींचे योगदान जाहीर केले आहे. यापैकी ५ कोटींची रक्कम महाराष्ट्र मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात आली असून, राज्यभरातील भीषण पुरानंतर तत्काळ मदत आणि पुनर्वसनाच्या कामांसाठी ही मदत उपयोगात आणली जाणार आहे.उद्योजक, परोपकारी आणि अभय भुतडा फाउंडेशनचे अध्यक्ष सीए अभय भुतडा यांनी स्वतः मुंबईत महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ५ कोटींचा धनादेश सुपूर्द केला.

### एमजीएमचे प्रा.लक्ष्मीकांत कोकाटे यांना पीएचडी प्रदान



छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.लक्ष्मीकांत कोकाटे यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.प्रा.लक्ष्मीकांत कोकाटे यांनी सिव्हिल इंजिनियरिंग या विषयात 'इफेक्ट ऑफ बाईंडर प्रॉपर्टीज बाय यूझिंग रिसायकल्ड टायर रबर ऑन बिट्युमिनस मिक्चर्स' या विषयावर आपले संशोधन केले आहे. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून डॉ.राजाराम दमगिर यांच्या मार्गदर्शनाखाली आपली पीएचडी पूर्ण केली आहे. प्रा.लक्ष्मीकांत कोकाटे यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे व सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## आयसीएसआय छत्रपती संभाजीनगरचा २४ वा वर्धापन दिन साजरा




छत्रपती संभाजीनगर, ११ ऑक्टोबर : इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया च्या पश्चिम भारत प्रादेशिक परिषदेअंतर्गत असलेल्या छत्रपती संभाजीनगर अध्यायाने आपला २४ वा वर्धापन दिन Regulatory Excellence: Mastering RPTs, MCA V3 Annual Filings and IPO Listings या विषयावर एकदिवसीय कॉर्पोरेट परिषद आयोजित करून साजरा केला. छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली.

कार्यक्रमाचे उद्घाटन सीएस महेश दुबे, अध्यक्ष - खउडख छत्रपती संभाजीनगर अध्याय यांच्या स्वागतपर भाषणाने झाले. सीएस धनंजय शुक्ला, अध्यक्ष - खउडख, नवी दिल्ली यांनी कंपनी सेक्रेटरीज या व्यावसायिक क्षेत्रातील वाढत्या संधींबरोबरच बदलत्या कायदेशीर आणि नियामक परिस्थितीत व्यावसायिकांसमोरील आव्हानांवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाला सीएस धनंजय शुक्ला (अध्यक्ष), सीएस पवन जी. चांडक (उपाध्यक्ष), सीएस आशिष करोडिया (केंद्रीय परिषद सदस्य), सीएस ऋषिकेश वाघ (चेअरमन, ), सीएस अभिषेक छाजेड (अध्यक्ष, TEFC, ICSI-WIRC), सीएस संजय पटारे (कोषाध्यक्ष, ICSI-WIRC), सीएस सागर कुलकर्णी (प्रादेशिक परिषद सदस्य), सीएस महेश दुबे (चेअरमन, छत्रपती संभाजीनगर अध्याय) आणि सीएस साईश्वर व्यास (सचिव, छत्रपती संभाजीनगर अध्याय) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशिष्ट अतिथी म्हणून महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, छत्रपती संभाजीनगरच्या कुलगुरू डॉ. बिंदू एस. रोनाल्ड आणि सुप्रसिद्ध उद्योजक अरविंद माचर उपस्थित होते. या परिषदेला कंपनी सेक्रेटरीज, उद्योग प्रतिनिधी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम ज्ञानविनिमय, संवाद आणि नेटवर्किंगसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरला. कार्यक्रमाचा समारोप सीएस साईश्वर व्यास, सचिव - खउडख छत्रपती संभाजीनगर अध्याय यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. व्यवस्थापन समितीचे सदस्य सीएस विपुल शर्मा, सीएस कोमल मुथा, सीएस गौरव वर्मा, सीएस सोमेशचंद्र काळे आणि सीएस रश्मी गंगवाल यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले.

## माजी जि. परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांनी दिला पूरग्रस्तांना मदतीचा हात



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

मागील महिन्यात झालेल्या ढगफुटीमुळे घोसला गावातील अनेक शेतकऱ्यांचे शेतजमिनी खरडून गेल्या व तोंडाशी आलेला घासही निसर्गाच्या पाण्याने हिरावून घेतला.या संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिपावलीपूर्वी आनंदाचा शिधा अशा स्वरूपात भाजपा नेत्या माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्यातर्फे मदतीचा हात.

या उपक्रमात भाजपा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे चिटणीस सुनिलजी गावंडे,तालुका अध्यक्ष संजय पाटील, तालुका उपाध्यक्ष विशाल गिरी,महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा नंदाताई आगे,जिल्हा कार्यकारिणी सदस्य वंदनाताई पाटील,तालुका ख.वि.संघ संचालक मयूर मनगटे,सुनील पाटील (घोसला),माजी उपसभापती चंद्रकांत पाटील,प्रमोद पाटिल तसेच किशोर बावस्कर,समाधान बावस्कर,प्रशांत गावंडे,प्रमोद पाटील,यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पूरग्रस्त शेतकरी व गावकऱ्यांना आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून आनंदाचा क्षण त्यांच्या आयुष्यात आणला.या मानवतेच्या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आशेचा किरण दिसून आला.

## २३ ते २६ ऑक्टोबर दिपावली निमीत्त मोंढा बंद

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी-दिवाळी म्हटलं कि आनंदाचा उत्सव मानला जातो. अगदी गरीबांपासून ते श्रीमंतांपर्यंत दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. त्याचप्रमाणे जुना मोंढा येथील दि जनरल किराणा मर्चंट असोसिएशनतर्फे कामगार, हमाल, रिक्षावाले आणि हातगाडी चालकांसाठी अनोखी 'आनंदाची दिवाळी' आयोजित केली जाते. या अंतर्गत सर्व कष्ट करणाऱ्या सर्वांना सुट्यांसह , भेटवस्तू आणि कौटुंबिक गेट टुगेदरची मेजवानी असते, अशी माहिती किराणा असोसिएशन तर्फ देण्यात आली असोसिएशनतर्फे सांगण्यात आले कि, शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या मोंढ्यात एकूण १२० प्रतिष्ठाने असून याठिकाणी ५५० कामगार, हमाल, रिक्षाचालक आणि हातगाडी चालक काम करतात. हे सर्वजण खऱ्या अर्थाने कणा आहेत. दरवर्षी आनंदाच्या दिवाळीनिमित्त त्यांना आराम मिळतो. तसेच त्यांना कुटुंबालाही वेळ देता येतो. त्यामुळे प्रत्येक व्यापारी त्यांच्या पातळीवर कामगाराला बोनस, फराळ, मिठाई आणि कपडे देत असतो. त्याचप्रमाणे असोसिएशनतर्फे दरवर्षी कामगारांसाठी कौटुंबिक गेट टुगेदरचेही आयोजन केले जाते.

या निमित्ताने २३ते २६ दरम्यान दिपावली निमीत्त मोंढा बंद राहणार असून २७तारखेपासून कामकाज पुन्हा पूर्ववत सुरु होईल, असे संजय कांकरिया -अध्यक्ष -व्यापारी महासंघ निलेश सेठी- संचालक कृ ऊ बाजार समिति हितेश कांकरिया -अध्यक्ष भाजपा व्यापारी आघाडी राकेश पांडे, आशीष सिसोदिया, मनोज शिंगवी, अंकित कासलीवाल, यश सोखिया,आशीष सुराणा, शशांक बाठिया, मयूर पहाड़े, नितिन सेठी असोसिएशनने कळविले.

### हिंगोली नगरपरिषद, हिंगोली

### सुचना

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ नुसार

क्रमांक.हिं.न.प./फेरबदल-३७/आरक्षण-१०१/ दि. ०६/१०/२०२५.

ज्याअर्थी, हिंगोली नगरपरिषद शहराची दुसरी सुधारीत विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-३११८/१३९६/प्र.क्र.-१३६/२०१८/नवि-३० दिनांक १० फेब्रुवारी २०१९ अन्वये भागश: मंजूर झाली असून, ती दिनांक १३ जुन २०१९ पासुन अंमलात आली आहे. तसेच उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्रमांक टिपीएस-३१२०/२९६/प्र.क्र.-४२/२०२०/नवि-३० दिनांक ०५ मार्च २०२१ रोजी मंजूर झाली असून दि. २३ एप्रिल २०२१ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, मौ.हिंगोली स.नं.६३ भाग चे क्षेत्र हे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.१०१ STADIUM एकुण क्षेत्रफळ-६.८०हे. करीता दर्शविण्यात आले आहे. मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे दि. ०३ ऑक्टोंबर २०२५ रोजीचे निर्देशानुसार, हिंगोली नगरपरिषद टराव क्र. ४७४, दि.०३ ऑक्टोंबर २०२५ अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदल करण्यास आणि त्याप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही प्रशासनामार्फत करणेबाबतचा टराव मा.प्रशासक, हिंगोली नगरपरिषद यांनी पारित केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आला आहे ) ;

उपरोक्त टरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत वापर विभागात करावयाचा फेरबदल खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

| अ.क्र | गावाचे नाव / सर्वे क्रमांक | मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे नाव आणि क्रमांक | विचाराधीन क्षेत्र | प्रस्तावित प्रमाणे फेरबदलानंतर अनुज्ञेय होणरा जमीन वापर विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | मौ.हिंगोली स.नं.६३ भाग | आरक्षण क्र.१०१ STADIUM | ६.८० हे. | ३.०हे. जागा STADIUM आरक्षणाकरीता राखीव ठेवून पुर्वेकडील ३.८०हे. जागा सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर विभागात समाविष्ट करणे. |

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत उपरोक्त प्रमाणे "प्रस्तावित फेरबदल" करण्याच्या अनुषंगाने हि सुचना नागरीकांकडून सुचना/आक्षेप मागविणेकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे. "प्रस्तावित फेरबदल" दर्शविणारा भाग नकाशा, हिंगोली नगरपरिषद, हिंगोली येथे सुचनाफलकावर जनतेच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे, प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरीकांना सुचना/आक्षेप असल्यास हि सुचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात आणि वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून एक महिन्याचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास द्याव्यात. नमुद कालावधीत प्राप्त होणा-याच सुचना/आक्षेप हिंगोली नगरपरिषदेमार्फत विचारात घेण्यात येईल.

प्रशासक
तथा
मुख्याधिकारी,
हिंगोली नगर परिषद

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नायगाव तालुक्यात वाळू माफीया जोमात तर पोलीस, महसुल कोमात ?

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १९ ऑक्टोबर-**

शासना मार्फत नायगाव तालुक्यात वाळूचा कुठलाच धक्का सुटला नसताना लोहा तालुक्यातील काही चोरटे वाळू माफिया नायगाव तालुक्यातून मात्र भरदिवसा व रात्री बोटीच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करत आहेत. आर्थिक लाभापोटी संबंधित महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने कुठलीही कारवाई होत नसल्याने सर्व सामान्य नागरिकांतून संबंधित विभागाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



नायगाव तालुक्यातील बरबडा, टाकळी अंतरगाव येथील गोदावरी नदी पात्रातून बोटीच्या सहाय्याने भरदिवसा व रात्री पंधरा ते वीस सक्शन पंप, तराफा व बोटीच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळू उपसा करून लोहा तालुक्यातील येळी, कामळज , कौडगाव, येथे नेत आहेत. व तेथून मोठमोठ्या हायवा टिप्परने ते येळी,कामळज , कौडगाव येथून मारतळा, नांदेड, कहाळा मार्ग गडगा, मुखेड, मारतळा ते वजीरगाव पाटी कहाळा मार्ग नायगाव, नरसी येथे भरदिवसा विक्री करून उच्छांद मांडला आहे. दरमहा ठरलेल्या प्रमाणे आर्थिक लाभापोटी येळी , मारतळा , कौडगाव , येथील तलाठी , मंडळ अधिकारी, व लोहा तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उस्मान नगर, कुंटूर , नायगावचे पोलीस ठाणे अधिकारी, यांनी जानीव पुर्वक दुर्लक्ष करताना दिसून येत आहे. याबाबत अनेकांनी तोंडी व लेखी तक्रार देऊन ही कारवाई होताना दिसून येत नाही. उलट त्या वाळू माफियांच्या विरोधात कुणी तक्रार दिली तर महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने वाळू माफियांना तुमच्या विरोधात तक्रार आली आहे. त्यांच काय ते बघून घ्या अशा सुचना वाळू माफियांना देत असल्याने ते माफिया तक्रारकर्त्यांना धमक्या देण्याचे प्रमाण वाढले आहे. तेव्हा जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी वेळीच लक्ष घालून या महसूल विभाव व पोलीस प्रशासनाची होणारी बदनामी व दिवसरात्र अवैध वाळू चोरी करणाऱ्या माफियांच्या विरोधात कारवाई करावी अशी मागणी सर्व सामान्य जनतेतून जोर धरत आहे.

**हप्त्याच्या वादातून हायवा जप्त; मालकाचा आत्महत्येचा प्रयत्न**

दरमहा ठरल्याप्रमाणे वेळेवर हप्ता न दिल्याने महसूल विभागातील तलाठी व मंडळ अधिकारी यांनी रेतीने भरलेला हायवा टिपर कुंटूर पोलीस ठाण्यात जप्त करून उभा केला. या कारवाईमुळे संतप्त झालेल्या हायवा मालकाने दि.१८ रोजी नायगाव तहसील कार्यालयासमोर किटकनाशकाचा डबा घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्याला ताब्यात घेतले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून महसूल विभाग व पोलिसांचे नेमके काय सुरू आहे, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# किनवट पंचायत समिती कृषी विभागातील योजनांमध्ये गैरव्यवहार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १९ ऑक्टोबर-**

पंचायत समिती किनवट अंतर्गत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक सरकारी योजना राबविण्यात येत आहेत. परंतु, या योजनांच्या अंमलबजावणीत गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचाराचे प्रकार उघड होत असल्याचे शेतकरी आणि स्थानिक नागरिकांच्या तक्रारींमधून समोर आले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी असलेल्या ट्रॅक्टर अनुदान योजना, ठिबक सिंचन योजना, सेंद्रिय खत व बायोफर्टिलायझर योजना, शेततळे व जलसंवर्धन योजना, पिक विमा योजना, कृषी उपकरण अनुदान योजना या सर्वांचा उद्देश शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेती टिकाऊ करणे हा असला तरी, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी योजना 'कागदोपत्री'च राबवल्या गेल्याचे दिसून आले आहे.

**कागदोपत्री लाभार्थी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना फायदा नाही**

अनेक शेतकऱ्यांनी तक्रार केली आहे की, संबंधित अधिकाऱ्यांकडून खोट्या नावावर लाभार्थी दाखवले जातात, काही ठिकाणी नातेवाईक, ओळखीचे किंवा पैसे देणारे व्यक्ती यांना योजनांचा लाभ दिला जातो. काही प्रकरणांत साहित्याचा दर्जा निकृष्ट असून, पुरवठादार व अधिकाऱ्यांमध्ये संगनमताने बिलं फुगवून दाखवली जातात, अशीही माहिती मिळाली आहे.

**सिंचन व जलसंवर्धन योजनेत मोठी अनियमितता**

ठिबक सिंचन आणि शेततळे योजनेत सर्वाधिक भ्रष्टाचार झाल्याचे स्रोत सांगतात. काही प्रकल्पांमध्ये प्रत्यक्षात काम पूर्ण झाले नसतानाही पूर्ण बिलं भरल्याचे दाखवले गेले आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांना स्वतःच्या खिशातून पूर्ण खर्च करावा लागला असून, अनुदानाची रक्कम अधिकाऱ्यांच्या खिशात गेल्याचा संशय व्यक्त होत आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी संघटनांनी या संदर्भात सविस्तर चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करून भ्रष्टाचार विरोधी खात्याने (उइ) हस्तक्षेप करावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणाबाबत पंचायत समितीतील कृषी विभागाचे अधिकारी बोलण्यास टाळाटाळ करत असून, सर्व योजना नियमानुसार पार पडत आहेत असे सांगत आहेत. मात्र, अनेक कागदपत्रे, खरेदी-विक्री नोंदी, आणि पुरवठा बिलांमध्ये विसंगती आढळल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे.

शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे की, संबंधित अधिकाऱ्यांची बदली करून स्वतंत्र समितीमार्फत लेखापरीक्षण करण्यात यावे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या नावावर होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा बसेल.

पंचायत समिती किनवटमधील कृषी विभागाच्या योजनांमधील अनियमितता हा शेतकऱ्यांच्या हक्कांवर घाला असून, त्यावर तात्काळ आणि पारदर्शक चौकशी व्हावी, हीच शेतकऱ्यांची एकमुखी मागणी आहे.

## नांदेड जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाकडून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ ऑक्टोबर-**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी किरण अंबेकर यांच्या नियंत्रणाखाली राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) ५ वी बटालियन, पुणे यांच्यामार्फत मौजे काळेश्वर, विष्णुपुरी येथे आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण व सराव सत्र बुधवार १५ ऑक्टोबर रोजी यशस्वीरीत्या पार पडले.

या प्रशिक्षणासाठी कमांडर रविंद्र कांबळे यांच्या नेतृत्वाखालील १७ जणांच्या दलाने सहभाग घेतला.

# नागलोक बुद्ध विहार येथे बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे समारोप



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ ऑक्टोबर-**

सिडको येथील नागलोक बुद्ध विहार येथे वर्षावास काळातील बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे वाचन करण्यात आले होते. ग्रंथ वाचन समारोप दिनांक १६ ऑक्टोंबर रोजी शेकडो बुद्ध अनुयायी यांच्या उपस्थितीत नागलोक बुद्ध विहार येथे पार पडला. यावेळी खिरदान व भोजनदान करण्यात आले. या वर्षावास काळात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन उपासिका उषाताई कांबळे व सविताताई जाधव यांनी केले होते.

वर्षावासाची सुरुवात भगवान गौतम बुद्धांनी केली होती.आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमेपर्यंत हा तीन महिन्याचा पावसाळ्यातील काळ बौद्ध भिक्षुनी एकाच ठिकाणी बसून ध्यान, साधना व इतरांना धम्म शिकवणे म्हणजे वर्षावास होय. याच काळात सिडको येथील नागलोक बुद्ध विहारात बुद्ध आणि त्यांचा धम्म वाचन करून दिनांक १६ ऑक्टोबर रोजी ग्रंथाचे वाचन समारोप करण्यात आला. याचवेळी या बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती पुतळ्याची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली तत्पूर्वी त्रिशरण पंचशील ग्रहण करून बुद्ध आणि त्याच्या धम्माच्या ग्रंथाचे शेवटचे अध्यायचे पान वाचन करून ग्रंथाचा समारोप करण्यात आला. या ग्रंथाचे वाचन उषाताई कांबळे व सविताताई जाधव यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष जीवन पाटील घोगरे हे होते तर नागलोक बुद्ध विहाराचे अध्यक्ष विलास गजभारे, सचिव प्रसेंजित वाघमारे, गंगाराम भालेराव, चंपतराव कांबळे, नागोराव डोंगरे, रावसाहेब सावते, सम्राट आढाव, अनिल मोरे, उषाताई मोरे, आकाश सोनकांबळे, संदीप नवघडे, सिद्धांत भोकरे, जनार्दन कांबळे, साहेबराव सोनसळे, आशाबाई सोनसळे, नम्रता गजभारे, पंचफुला जोंधळे, शुभांगी कांबळे, सुनंदा पाईकराव, प्रमिल कांबळे, पंचशीला भदरगे, जयश्रीला बेरज, अर्चना कांबळे, अनिता कांबळे, मीना आंबोरे, रमाबाई गवारे, सुजाता गवारे, सुजाता आढाव, ज्योती आढाव, अश्विनी भुरे यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसेनजीत वाघमारे यांनी केले तर महाराष्ट्राचे ख्यातनाम शाहीर गौतम पवार यांनी आपल्या बुलंद आवाजातून समाज प्रबोधन पर गीत गायले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाखा महिला मंडळ नागलोक बुद्ध विहार सिडको यांनी परिश्रम घेतले.

## पक्षाने संधी दिल्यास जिल्हा परिषद लढू: अमोल पाईकराव

**निवघा** -आगामी होऊ घातलेल्या जि.प., पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या कार्यक्रमास सुरुवात झाली असल्याने दि. १५ रोजी झालेल्या आरक्षण सोडत निवघा तळणी जि. प गट ी ल महिला करिता सुटल्याने निवघा तळणी जि.प. गटातून निवडणूक पक्षाने जर उमेदवारी दिली तर निश्चितच आगामी जिल्हा परिषद लढू असे प्रतिपादन निवघा बा येथील प्रतिष्ठित नागरिक अमोल नारायण पाईकराव (लखापती) यांनी म्हटलं सौ अक्षरा अमोल पाईकराव ह्या अमोल पाईकराव नारायण यांच्या पत्नी होत. जि.प. प.स.च्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ते पत्रकारांशी वार्तालाप करत होते त्याच बरोबर ते सेवा सहकारी सोसायटी निवघा बा येथील संचालक आहेत जर पूर्णपणे मन लावून विकास कार्यात झोकून दिले तर व जि.प. गटाचा सर्वांगीण विकास सुद्धा आपण करू शकतो असा अत्मविश्वास आहे या निर्माण झाला असल्याने व नजीकच्या काळात होणार असलेल्या जि.प., पं. स. च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवघा तळणी जि.प. गट ी ल महिला सुटला असल्या कारणाने. त्याच अमोल पाईकराव हे हदगांव हिमायतनगर चे आमदार बाबुरावजी कदम यांचे अत्यंत विश्वासू मानले जातात. निवघा तळणी गटातील सर्व गावातसर्वच जाती धर्माच्या नागरिकांसोबत संबध आल्याने व सर्वांशी आपुलकीचे नाते निर्माण झालेले असल्यामुळे जि.प. गटातील प्रत्येक गावातील सुज्ञ नागरीकाकडून आग्रह होत असल्याने याबाबत मी सकारात्मक विचार केला आहे. जि.प. च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्ष प्रस्थापित निवघा तळणी सर्कल मध्ये विकासाचा अनुशेष शिल्लकच राहिलेला आहे. तो अनुशेष भरून काढण्याचा माझा मानस असून होणाऱ्या जि.प. निवडणुकीत निवघा तळणी गटातून संपूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार असल्याचा मानस अमोल पाईकराव यांनी बोलतांना व्यक्त केला.

## एक हात मदतीचा वंचित बेघरांना कपड्यासह जीवनावश्यक वस्तूंची वाटप

**नांदेड** -भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा स्थान असलेल्या दीपावली सणाला प्रारंभ झाला असून बेघर व भटक्या समुदायातील लोकांची दिवाळी सर्व सामान्याप्रमाणे उत्साहात साजरी व्हावी यासाठी आदर्श शिक्षक राजकुमार राठोड व युवा साहित्यिक सोनू दरेगावकर यांच्या हस्ते उपेक्षितांना कपडे व जीवनावश्यक वस्तूंच्या किट चे वाटप केले. नांदेड शहरातील रेल्वे स्थानक च्या जवळील स्टेडियम परिसरात मोठ्या प्रमाणात भटके फूटपाथ वर पालामध्ये वास्तव्यास आहे. त्यांचा सण सर्वसामान्य सहज साजरा व्हावा त्यांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा या हेतूने दरवर्षी काही सामाजिक संस्थांसह वैयक्तिकरित्या या बेघरांना मदत करण्यात येते. १९ ऑक्टोबर रोजी सहशिक्षक राठोड व दरेगावकरांनी फुटपाथ वर राहणाऱ्या तब्बल ५० भटक्या समुदायातील बालकांना कपडे वाटप केले. या कपडे वाटपानंतर या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळ्या प्रकारचा आनंद दिसून येत होता. अशाप्रकारे वंचितांची दिवाळी साजरी करण्यासाठी इतरही सामाजिक संस्था आणि नागरिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहनही उपक्रमशील राजकुमार राठोड, युवा साहित्यिक सोनू दरेगावकर यांनी यावेळी केले.

## जवळा दे येथील मुलींनी टाकाऊपासून बनवले आकाश कंदील

**नांदेड** -जिल्ह्यातील शाळांना दिपावली निमित्त दि. १७ पासून सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. दिपावली सण हा साधारणपणे पाच दिवसांचा असतो. दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा असेही म्हटले जाते. या काळात सोने, कपडे, दिवे, मिठाई, फटाके, शोभेच्या वस्तू तसेच सजावटीचे साहित्य मोठ्या प्रमाणावर खरेदी केले जाते. बाजारपेठा विविध प्रकारच्या वस्तूंनी फुललेल्या असतात. रंगीबेरंगी आकाशकंदीलही मोठ्या प्रमाणावर विक्रीला उपलब्ध असतात. बाजारात महागडे आकाशकंदील विकत घेण्याइतकेही पैसे नसणाऱ्या शाळेतील मुलींनी टाकाऊ वस्तू पासून आकाशकंदील तयार केले आहेत. जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मुलींनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वापरलेले पुठ्ठे, नक्षी, ठसे, जाड कागद, झालर, मणी आदी वस्तूंपासून आकर्षक आकाशकंदील तयार केले आहेत. याचबरोबर प्रदूषणमुक्त दिपावली साजरी करण्याचे आवाहनही केले आहे. दीपावलीच्या काळात वायू व ध्वनी प्रदूषण खूप होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षिका संगिता बडवणे, उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांनी विद्यार्थींना विविध फटाक्यांपासून होणारे प्रदूषण याविषयी माहिती दिली. तसेच यापासून मानवास होणारे नुकसान याचीही माहिती दिली. आकाशकंदील तयार केल्यानंतर शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थीनीनी इतर मुलांसह तसेच लिट्ल मास्टर्स अवेअरनेस पॅनलचे प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिपावली साजरी करावी असे आवाहन केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले, माजी अध्यक्ष किशनराव गच्चे, तुकाराम गोडबोले, हैदर शेख, मनिषा गच्चे, हरिदास पांचाळ, इंदिरा पांचाळ आदींची उपस्थिती होती.

# हडको बालाजी मंदिर देवस्थान येथे विरंगुळा केंद्राचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ ऑक्टोबर-**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विकास कामासाठी निधी कमी पडणार नाही.असे प्रतिपादन नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी केले. हडको येथील श्री बालाजी मंदिर देवस्थान येथील विरंगुळा केंद्राचे उद्घाटन आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात आ.हेमंत पाटील यांची उपस्थिती होती.



नवीन नांदेड भागातील विविध विकास कामासाठी आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडून निधी मिळत आहे. शिवाय विधानपरिषदेचे आमदार शिवसेनेचे उपनेते हेमंत पाटील यांच्याकडूनही बालाजी मंदिर देवस्थानास मंडळासाठी २० लक्ष निधी देतो आसे सांगितले आहे. आ.आनंदराव बोंढारकर यांनी देखील २०लक्ष रूपये देण्याचे आश्वासन दिले.

त्यामुळे दक्षिण विधानसभा मतदारसंघात निधीअभावी कोणतेही विकास कामे रखडणार नाहीत. येणाऱ्या काळात रस्ते, नाली, समाज मंदिर व इतर धार्मिक स्थळांचा कायापालट होणार आहे. विधानसभेचा एक आमदार असला तरी आपल्या दक्षिण विधानसभा मतदारसंघात हेमंतभाऊ यांच्यामुळे दोन आमदारांची ताकद आपल्याला मिळत आहे, असेही बोंढारकर म्हणाले.यावेळी संस्थापक अध्यक्ष माणिक देशमुख, अध्यक्ष अरूण दमकोंडवार, डॉ.नरेश रायवार, विनय गिरडे, संतोष वर्मा, प्रकाशसिंह परदेशी, चंद्रशेखर चव्हाण, बालकृष्ण येलगेवार यांच्यासह आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पत्रकार दि.गा. पाटील यांनी केले

# जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता राष्ट्रवादीकडून नवीन कार्यकारणी जाहीर

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १९ ऑक्टोबर-:**

मुदखेड तालुका व शहरातील जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात न घेताच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या जिल्हाध्यक्षांनी नवीन कार्यकारणी जाहीर केल्याने शहरात व तालुक्यात कार्यकर्त्यात नाराजी व्यक्त केल्या जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी या मतदारसंघात विरोधकांना मिशनबद्ध करून ठेवले असताना सुद्धा या तालुक्यात व शहरात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते जीवा पलाड काम करत होते कोणताही कार्यक्रम राष्ट्रवादीचा असो ते जीव लावून करत असताना सुद्धा त्यांना कुठल्याही पद्धतीने विश्वासात न घेता जिल्हाध्यक्ष यांनी नवीन कार्यकारणी जाहीर केल्याने शहरातील व तालुक्यातील कार्यकर्त्यांची नाराजी झाली असून. जुन्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे काम जोमाने केले असल्याचे दिसून येत होते. काही पदाधिकाऱ्यांनी येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीत निवडणूक स्वतंत्र लढण्याची भाषा केली होती म्हणून त्यांना डावलण्यात आले की काय असा सवाल सर्वसामान्य जनतेतुन केली जात आहे नवीन कार्यकर्त्यांकडे कार्यकर्त्यांची फळी जमल्यास बराच वेळ लागेल या निवडणुकीत जे जुने बांधणी केली होती ती नव्यांना जमेल काय असा सवाल नागरिकातून केला जात आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष नांदेड जिल्हाध्यक्षपदी अमोल मालेगावकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ ऑक्टोबर-**

अर्धापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आढावा बैठकीत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते अमोल मालेगावकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाध्यक्षपदी नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगांवकर, माजी आमदार मोहनराव (अण्णा) हंबर्डे, माजी आ. सुभाष साबणे, स्वप्नील इंगळे, प्रदेश सचिव प्रा. सुनील नानवटे आत्माराम कपाटे (अध्यक्ष अर्धापूर), अभिषेक लुटे (अध्यक्ष हिमायतनगर) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनेक मान्यवर उपस्थित होते.

अमोल मालेगावकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रवीण घुले, मयूर कोकरे, संदीप अटकोरे आदींनी शुभेच्छा दिल्या.

# नाम फाउंडेशन आणि शिवार हेल्पलाइनतर्फे शेतकऱ्यांना बियाणे वाटप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ ऑक्टोबर-**

जिल्ह्यात माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या बाधित शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने नाम फाउंडेशन संस्थेने कृषी विभागाच्या समन्वयाने हरभरा पिकाचे ६०० व ज्वारी पिकाचे १६० क्विंटल बियाणे मोफत उपलब्ध करून दिले. जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात बियाणे आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी इतर शासकीय संस्थानीही मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.




आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या हस्ते जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, शिवार हेल्पलाइनचे विनायक हेगाणा, नाम फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके, जिल्हा समन्वयक कुंपलवार, समन्वयक दत्तात्रय गरजे, उपविभागीय दंडाधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, उपविभागीय कृषी अधिकारी गीते (देगलूर), शिरफुले (नांदेड), तहसीलदार संजय वारकड, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल आणि नांदेड व अर्धापूर तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

हवामान बदलामुळे अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश घटनांमध्ये वाढ झाली असून त्याचा थेट परिणाम शेतीवर होत आहे. नांदेड जिल्ह्यात खरीप हंगामात सुमारे ८६ टक्के क्षेत्र सोयाबीन व कपाशी पिकाखाली असून ही पिके नैसर्गिक आपत्तीला अधिक बळी पडणारी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी फळबाग, ऊस, रेशीमशेती आदी अतिवृष्टीला प्रतिकारक पिकांकडे वळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

तसेच आपत्ती सौम्यीकरणासाठी पुढील कालावधीत जिल्ह्यातील नदी-नाल्यांचे सरळीकरण व खोलीकरण, जलतारा, विहीर पुनर्भरण, रुंद वरंबा सरी पद्धतीने पेरणी आदी उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून नदीकाठांवर बांबू लागवड करून पुर नियंत्रणाचे कार्य करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी गटशेतीचा अवलंब करून मजुरी समस्येवर मात करावी. तसेच अशासकीय संस्थांनी सामाजिक जबाबदारी म्हणून शेतकऱ्यांना विविध उपाययोजनांद्वारे मदतीचा हात द्यावा, असेही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी आवाहन केले.

नाम फाउंडेशनने साधारणतः ९५ लाख रुपये किमतीचे हरभरा पिकाचे बियाणे नांदेड जिल्ह्यास पुरवठा केले असून ते गाव पातळीवर कृषी विभागाच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीने बाधित ६ हजार शेतकऱ्यांना प्राधान्याने वाटप करण्यात येणार आहे असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी प्रास्ताविकात सांगितले.

शिवार हेल्पलाइनचे विनायक हेगाणा यांनी सांगितले की, संस्थेमार्फत निविष्ठा स्वरूपात मदत तर केली जातेच, तसेच मानसिक पाठबळही दिले जाते. नैराश्य वा वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांनी शिवार हेल्पलाइनच्या ८९५५७७१११५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले.

नाम फाउंडेशन राजाभाऊ शेळके यांनी सांगितले की, संस्थेमार्फत नांदेड जिल्ह्यातील ४१ नाल्यांवर ३० हजारांहून अधिक बांबू लागवड, पूरग्रस्त शेतकऱ्यांना अन्नधान्य किटचे वाटप तसेच शेतात गाळ टाकण्याची कामे सुरू आहेत.

या कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात शेतकऱ्यांना हरभरा व ज्वारी पिकांचे बियाणे वाटप करण्यात आले. नाम फाउंडेशनने सामाजिक उत्तरदायित्वातून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना मोफत बियाणे पुरवठा केल्याबद्दल जिल्हाधिकारी महोदयांनी या संस्थेचे आभार मानले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मंडळ कृषी अधिकारी सानप, तंत्र अधिकारी राजेश मिरगेवार, तंत्र अधिकारी फलोत्पादन स्वामी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांनी सहकार्य केले.